रमजान मुबारक
२५
आज का इफ्तार
६.४०
कल की सहेर
५.१३

# पार्श्वभूमी

**2 प्लॉट विकणे आहे**
पांगरी रोड, जिजाऊ सृष्टी मधील पुर्वमुखी 32 x 52 साईजचा प्लॉट विकणे आहे व टींक्कल स्टार शाळेच्या पाठिमागे 29 x 46 साईजचा पुर्व मुखी प्लॉट विकणे आहे.
:: संपर्क ::
9421626899 9881050853
16587-13786

बीड वर्ष ३६ वे अंक १०५ वा फोन २३०१०१ दिनांक १५ मार्च २०२६ रविवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

# गर्दी करु नका, १ सिलेंडर कुटुंबाला दीड महिना पुरते
# इराण अमेरिकेला ठोकत असल्याने अनेकांना आनंद




बीड दि.१४ (प्रतिनिधी):– राज्यात आणि जिल्ह्यात पेट्रोल आणि गॅसची कुठल्याही प्रकारची टंचाई नाही तरी पण विनाकारण गॅसच्या एजन्सी समोर नागरिकांच्या रांगा वाढत आहेत आणि विनाकारण फार मोठे गॅसचे संकट निर्माण झाले आहे असे चित्र निर्माण केले जात आहे परंतु वस्तुस्थिती तशी नाही, सर्वांना पुरेल एवढा गॅस उपलब्ध असून बुकींगनुसार प्रत्येकाला सिलेंडर मिळणार आहे. एक गॅसचे सिलेंडर एका कुटुंबाला दीड ते दोन महिने जाते. तोपर्यंत तर युद्ध नक्कीच शमलेले असणार आहे, त्यातच इराणमधून दोन भारतीय नौका एलपीजी गॅस घेऊन भारताकडे सुखरुप निघालेल्या आहेत त्यामुळे तुटवडा हा फक्त बातम्यात आणि सोशल मीडियावर आहे. नागरिकांनी घाबरुन न जाता विनाकारण गॅससाठी पळापळ करु नये, स्वत: जिल्हाधिकाऱ्यांनी कुठलीही टंचाई नसल्याबद्दल आवाहन केलेले आहे. या युद्धामुळे अनेक गोष्टींवर परिणाम होत असले तरी बलाढ्य अमेरिकेला इराणसारखा देश हा सळो की पळो करुन सोडत आहे, जगाला दादागिरीची भाषा करणाऱ्या अमेरिकेला इराण ठोकत असल्याबद्दल अनेकांना आनंद होत आहे.

## जिल्ह्यात घरगुती गॅसची टंचाई नाही पुरेसा साठा आहे -जिल्हाधिकारी



बीड जिल्ह्यामध्ये घरगुती गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, कुठलीही टंचाई नाही. जिल्ह्यात घरगुती गॅसचा तुटवडा जाणवणार नाही, विनाकारण साठेबाजी करु नका, नागरिकांनी घाबरुन जाऊन विनाकारण बुकींगसाठी गर्दी करु नये. बुकींगसाठी विनाकारण गर्दी केली जात आहे. शासन स्तरावर अधिकाऱ्यांचे पथक तयार करुन परिस्थितीवर नियंत्रण ठेवले जात आहे. साठेबाजी करणाऱ्यांवर कारवाई करत आहे. व्यावसायीक गॅस वापरण्यासाठी सुद्धा हॉटेल आणि शाळांना पुरेसे सिलेंडर उपलब्ध करुन दिले जात आहेत. नागरिकांनी अडचण असल्यास तक्रार करावी, पान २ वर



सध्या संपूण देशभरात गॅसवरुन मोठ्या प्रमाणात राजकारण केलं जात आहे. त्यातच विरोधक सत्ताधाऱ्यांना घरगुती गॅसच्या टंचाईवरुन धारेवर धरत आहेत. बीड जिल्ह्याचा विचार केला तर जिल्ह्यात मुबलक प्रमाणात एलपीजी गॅसचा पुरवठा आहे परंतु युद्धाच्या पान २ वर

### गोवऱ्यांचे दर वधारले

पुणे दि.१४ (वृत्तसेवा):- इराणवर इस्त्रायल-अमेरिकेने चढवलेलला हल्ला., त्यानंतर युद्धाला फुटलेलं तोडं, याला आज १५ दिवस उलटून गेले आहेत. पण तीन देशांच्या या युद्धाच्या अख्ख्या जगाला फटका बसत असून अनेकांना त्याची झळ पोहोचली आहे. पान २ वर

**2 BHK फ्लॅट किरायाने देणे आहे**
सारडा संकुल, सुभाष रोड, बीड येथे प्रशस्त दोन बीएचके फ्लॅट किरायाने देणे आहे.
पिणे-वापरणे मुबलक पाणी उपलब्ध.
संपर्क:-9960420388

### बीड तालुक्यात माणुसकीला काळिमा फासणारी घटना
## विवाहितेवर अत्याचार करुन गावच्या चावडीवरील खांबाला बांधून ठेवले

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- विवाहितेला घरातून उचलून गावाबाहेर नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे. अत्याचारानंतर नराधमाने पीडित महिलेला गावात आणून चावडीवरील खांबाला बांधून ठेवले होते. या प्रकारामुळे सर्व स्तरातून संताप व्यक्त होऊ लागला असून घटनेचे गांभीर्य पाहता पिंपळनेर पोलिसांनी तातडीने सुत्रे हलवून आरोपी वैभव पटेकर याला गजाआड केले. शनिवारी पटेकरला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

**नराधम वैभव पटेकर गजाआड, १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी**

बीड तालुक्यातील पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीत माणुसकीला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. हद्दीतील एका गावात पीडित महिला आपल्या घरात कुटुंबियांसह झोपलेली असतांना आरोपीने तिला जबरदस्ती घरातून उचलून गावाबाहेर नेले, त्यानंतर तिच्यावर अत्याचार केले, इतकेच नव्हे तर या कृत्यानंतर नराधमाने महिलेला पुन्हा गावात आणले आणि गावातील चावडीच्या खांबाला बांधून ठेवले अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. सकाळी हा प्रकार लक्षात येताच गावातील काही नागरिकांनी पान २ वर



## अल्पवयीन मुलीचे हातपाय बांधून दोन नराधमाकडून पाशवी अत्याचार
### पोक्सो अंतर्गत गुन्हा, दोघेही फरार

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर दोन नराधमांनी पाशवी अत्याचार केल्याची धक्कादायक घटना परळी तालुक्यात घडली आहे. दोन्ही नराधमांनी पीडित मुलीचे हातपाय घट्ट बांधले आणि ती ओरडू नये म्हणून तिच्या तोंडात कापडाचा बोळा कोंबला, अशीही संतापजनक माहिती समोर आली आहे. या प्रकरणात दोन्ही नराधमांविरुद्ध पोक्सो अंतर्गत परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.
परळी ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील एका गावात १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला आरोपींनी गोड बोलून आपल्या घरी बोलाविले होते. मुलीने घरात प्रवेश करताच आरोपीने दरवाजा बंद केला, पान २ वर



# मतदार यादी पडताळणी प्रक्रिया (एस आय आर ) : नागरिकांनी भीती व संभ्रम बाळगू नये - तहसीलदार शेळके

बीड दि.१४ (प्रतिनिधी):- लोकशाही व्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा पाया म्हणजे मतदानाचा अधिकार. नागरिकांनी आपल्या प्रतिनिधींची निवड करण्यासाठी दिलेला मताचा अधिकार हा लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या संपूर्ण प्रक्रियेचा आधार असतो तो म्हणजे मतदार यादी. मतदार यादी अचूक , अद्ययावत आणि पारदर्शक राहणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. त्यामुळे भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी मतदार यादीचे पुनरावलोकन , सुधारणा आणि अद्ययावत प्रक्रिया राबविली जाते.

सध्या मतदार यादी पडताळणी व विशेष सघन पुनरावलोकन ( एस आय आर ) प्रक्रियेबाबत काही नागरिकांमध्ये संभ्रम किंवा भीती निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी अपुरी किंवा चुकीची माहिती पसरत असल्याने मतदारांमध्ये अनावश्यक गैरसमज निर्माण होत आहेत. प्रत्यक्षात ही प्रक्रिया नागरिकांच्या मतदान हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि मतदार यादी अधिक अचूक करण्यासाठी राबविली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता प्रशासनाला सहकार्य करावे , असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

भारतामध्ये मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया भारतीय संविधान आणि जनप्रतिनिधी कायदा १९५० व १९५१अंतर्गत ठरविण्यात आलेली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक राज्यात मतदार यादी तयार केली जाते. जिल्हाधिकारी हे संबंधित जिल्ह्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहतात. त्यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , नायब तहसीलदार तसेच मतदान केंद्र स्तरावर नियुक्त करण्यात आलेले केंद्रस्तरीय अधिकारी हे मतदार नोंदणी आणि पडताळणीचे काम करतात. मतदार यादी तयार करताना नागरिकांचे नाव , पत्ता , वय , मतदान केंद्र तसेच इतर आवश्यक तपशील नोंदविले जातात. नागरिकांचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना मतदार म्हणून नोंदणी करता येते. या प्रक्रियेमुळे प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळतो.

लोकसंख्या वाढ , स्थलांतर , मृत्यू किंवा नवीन मतदारांची नोंदणी यामुळे मतदार यादी वेळोवेळी बदलत राहते. त्यामुळे भारत निवडणूक आयोगाकडून नियमितपणे मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रिया राबविली जाते. या प्रक्रियेत नवीन मतदारांची नोंदणी , मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे , मतदारांच्या तपशीलात सुधारणा , मतदान केंद्रांची पुनर्रचना तसेच डिजिटल मतदार यादी अद्ययावत करणे या महत्त्वाच्या बाबींची अंमलबजावणी केली जाते. यामुळे मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक राहते.

मतदार यादी अधिक अचूक करण्यासाठी वेळोवेळी विशेष सघन पुनरावलोकन प्रक्रिया राबविली जाते. या प्रक्रियेत जुन्या मतदार यादीतील नोंदी तपासून त्या अद्ययावत करण्याचे काम केले जाते. मात्र सध्या प्रत्यक्ष पुनरावलोकन प्रक्रिया सुरू झालेली नसून त्याची पूर्वतयारी सुरू आहे. या टप्प्यात २००५ सालातील मतदार यादी आणि २०२४-२५ मधील विद्यमान मतदार यादी यांचे परस्पर जुळवणीचे काम चालू आहे.

बीड तालुका हा बीड , गेवराई आणि केज या विधानसभा मतदारसंघांमध्ये विभागलेला आहे. आजच्या घडीला बीड तालुक्याची एकूण मतदार संख्या ४,५१,२२५ इतकी आहे. त्यामध्ये पुरुष मतदार २,३७,६४४ असून स्त्री मतदार २,१३,५६९ आहेत. सध्या तालुक्यात ४५७ मतदान केंद्रांच्या माध्यमातून मतदारांचे मतदार ते मतदार आणि मतदार ते कुटुंब अशा पद्धतीने जुळवणीचे काम सुरू आहे. ज्या मतदारांचे जुळवणीचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही अशा मतदारांची स्वतंत्र यादी तयार करण्यात येत आहे. प्रत्यक्ष सघन पुनरावलोकन प्रक्रिया सुरू झाल्यानंतर सर्व केंद्रस्तरीय अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रातील गाव , प्रभाग आणि मतदान केंद्र क्षेत्रात जाऊन प्रत्येक मतदाराच्या कुटुंबाशी संपर्क साधतील. त्या वेळी २००५ च्या मतदार यादीतील संदर्भ तपासले जातील आणि मतदारांची नोंद परस्पर



जुळवणीद्वारे जोडली जाईल. जर त्यानंतरही काही मतदारांची जुळवणी होऊ शकली नाही , तर अधिकारी पुन्हा घरभेट देऊन संबंधित मतदारांकडून निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या तेरा ओळखपत्रांपैकी एक ओळख पुरावा स्वीकारतील आणि आयोगाच्या विहित नमुन्यातील अर्ज भरून घेतील. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये कोणताही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये याची विशेष दक्षता प्रशासनाकडून घेतली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे .निवडणूक आयोगाने नागरिकांना माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी विशेष मोबाईल अनुप्रयोग उपलब्ध करून दिला आहे. या माध्यमातून नागरिकांना जुनी मतदार यादी तपासता येते. अनुप्रयोगामध्ये मतदार नोंदणी अर्ज , मागील पुनरावलोकनातील नाव शोधा आणि मतदार तपशीलाच्या आधारे शोधा असे पर्याय उपलब्ध आहेत. नाव सापडल्यानंतर त्यातील मतदारसंघ , भाग क्रमांक आणि अनुक्रमांक ही माहिती संबंधित केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडे दिल्यास पुढील प्रक्रिया सुलभ होते.

बीड जिल्ह्यात मतदार यादी पडताळणीचे काम जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी मनोज घोडे पाटील यांच्या समन्वयातून संपूर्ण जिल्ह्यातील निवडणूक यंत्रणा कार्यरत आहे. बीड उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरावर पडताळणी प्रक्रिया प्रभावीपणे राबविली जात आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनीही नागरिकांशी संवाद साधत मतदार नोंदणी आणि पडताळणी प्रक्रियेत सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

नर्मदा परीक्रमा संतांची डोंगरकिन्ही येथे अभूतपूर्व मिरवणूक व स्वागत संपन्न

# मनुष्याच्या जीवनरुपी परीक्रमेला संत विचारांच्या अनुकरणाची गरज -स्वामी हरीहरानंद

डोंगरकिन्ही दि.१४ (प्रतिनिधी):- संत ,संन्यासी जीवन सोपे नाही ते समाजासाठी फार मोठा त्याग करत असतात. समाजाला संत होण्याची नव्हे तर संत विचार अनुकरण करण्याची गरज आहे. गुरु व संताची आज्ञा ही ईश्वर स्वरुप असते त्यांची सोबत जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत राहते असे विचार स्वामी हरिहरानंद सरस्वती महाराज यांनी डोंगर किन्ही येथे ग्रामस्थांनी आयोजित केलेल्या सत्कार प्रसंगी व्यक्त केले. १३ मार्च रोजी ३६०० कि.मी पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण करुन आल्याबद्दल सहभागी संताचे डोंगरकिन्ही येथे अभूतपूर्व भव्य मिरवणूक व स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता.मिरवणुकीत पुणे येथील ढोल पथक बॅण्ड पथक, लेझीम पथक, हरीयाणा अघोरी बाबा नृत्य कला, तसेच लातूर येथील रांगोळी कलाकारांचे आकर्षक रांगोळ सादरीकरण पाहायला मिळाले.

उज्जेन ओंकारेश्वर येथून दादा गुरु महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सलग १२७दिवस ३६०० पायी नर्मदा परिक्रमा संपन्न झाली.यामध्ये पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथील संत हरिहरानंद सरस्वती महाराज, लक्ष्मण सस्ते महाराज , शिवाजी महाराज नगद नारायण गड, नारायण डिसले महाराज, तसेच शिवाजी महाराज गुजर, सातपुते महाराज, इ. भाविक सहभागी झाले होते. सर्व सहभागी संतांची डोंगरकिन्ही येथे भव्य मिरवणूक व स्वागत समारंभ संपन्न झाला. यावेळी नारायण महाराज डिसले यांनी नर्मदा परिक्रमा दरम्यान आलेले अनुभव व्यक्त केले. ही अत्यंत



कठोर त्यागाची यात्रा असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की आपल्या परीसराचे भाग्य चांगले की, स्वामी हरिहरानंद यांच्या सारखे संत त्यागी आपल्याला मिळाले आहेत. आपण सर्वांनी एकजुटीने एकत्र येत १० गुंठे जागा व चारचाकी गाडी भेट दिली ही खुप मोठी गोष्ट असल्याचे कौतुकास्पद मत व्यक्त केले. नर्मदा परिक्रमा तपश्चर्या ची ताकद आहे असे मत ह.भ.प. शिवाजी महाराज नगद नारायण गड यांनी व्यक्त केले व लक्ष्मण महाराज सस्ते , यांनीही आपले अनुभव व्यक्त केले. पुढे बोलताना स्वामी महाराज म्हणाले की दादा गुरु महाराज हे दैव रुप आहेत. गेल्या सहा वर्षांपासून ते फक्त नर्मदा पाणी पिऊन जगत आहेत त्यांच्या समवेत १२७ दिवस चालण्याचा राहण्याचा, विचार ऐकण्याची संधी ही ईश्वराची प्राप्ती आहे. ते सांगतात हिंदू धर्माचे रक्षण करा, एक गाय पाळा, गावातले पाणी आडवा व जिरवा प्रत्येकाने एक झाड लावून ते जगवले पाहीजेत. नर्मदा ही केवळ नदी परीक्रमा नाही ती एक साक्षात शक्ती आहे,आई आहे तिच्या सहवासाने वाईट विचार , आजार ही नष्ट होतात. पंचक्रोशीतील भाविकांनी अशा प्रकारे केलेले भव्य स्वागत याने जीवन सार्थ झाल्याच्या भावना व्यक्त केल्या.मी एक संन्यासी आहे आणि संन्याशाला कशाचाही मोह नसतो मात्र आपण दिलेल्या प्रेम रुपी मोहामध्ये मला अडकवले असल्याच्या भावना व्यक्त केल्या. आपण दिलेल्या प्रेम रुपी सुविधा हे आपल्याच गावचे वैभव आहे ते आपणच सांभाळा अशा कृतज्ञ भावना त्यांनी व्यक्त केल्या. आश्रयासाठी जागा देणारे काथवटे परीवार यांचाही सत्कार आश्रमाच्या वतीने करण्यात आला. पुत्र व्हावा ऐसा गुंडा। त्याचा तिही लोकी झेंडा ए या संत विचारा प्रमाणे स्वामीं चा जीवन प्रवास आपल्या संन्यासी मुलांचे कौतुक पाहण्यासाठी आलेल्या माता - पिता यांचाही आश्रमाच्या वतीने सत्कार करण्यात आला. धार्मिक उत्साह पार पडणाऱ्या या सोहळ्यास मान्यवर संत महंत शिवाजी महाराज नारायणगड, महादेव महाराज, विष्णु देवानंद भारती, शिवानंद महाराज सरस्वती, महेंद्र महाराज मळेकर शास्त्री, गोपाला नंदगिरी महाराज, बालयोगी ऋषीनाथ महाराज, शिवानंद महाराज तांबाराजुरी, उमानंद सरस्वती महाराज, गणेश महाराज पिंपळनेर, राम महाराज डोंगर जाटनांदूर, यांची प्रमुख उपस्थिती होती.

# जिल्हा परिषद शाळा रामबाग वडवणी वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ उत्साहात संपन्न

वडवणी दि.१४ (प्रतिनिधी):- जिल्हा परिषद शाळेत शिकलेला विद्यार्थी आज प्रगतीच्या शिखरावर आहे, रामबाग येथील जिल्हा परिषद शाळा सध्या भाड्याच्या (किराया) जागेत भरत असून, विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय आम्ही जवळून पाहिली आहे. ही नवीन इमारत दुरुस्त करून ती शिक्षणासाठी योग्य करण्यासाठी नगरसेवक श्री. नागेश डीगे यांनी वैयक्तिक स्तरावर मोठे परिश्रम घेतले आहेत. त्यांच्या या पाठपुराव्यामुळेच येत्या जून महिन्यापर्यंत या इमारतीचे हस्तांतरण करून शाळा नवीन हक्काच्या



वास्तूत स्थलांतरित केली जाईल, असे महत्वपूर्ण आश्वासन वडवणीचे नगराध्यक्ष श्री. शेषेराव बापू जगताप यांनी दिले.

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामबाग येथे आयोजित 'वार्षिक स्नेहसंमेलन चा सोहळा शुक्रवारी दिनांक १३/०३/२०२६ रोजी अत्यंत दिमाखात संपन्न झाला, त्याप्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गणेशरावजी टकले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वडवणी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे साहेब यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे कौतुक केले. तसेच केंद्रप्रमुख (कन्या वडवणी) शेख सैलानी सर यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन दिले. व्यासपीठावर उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, के.प्रा. शाळा वडवणीचे मुख्याध्यापक तथा प्रसिद्ध कवी श्री. बापू धनवे सर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती तिडके मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

आठवणींचा उजाळा आणि कलेचा सन्मान

यावेळी बोलताना उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांनीही आपल्या जिल्हा परिषद शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. स्नेहसंमेलन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणारे महत्त्वाचे व्यासपीठ आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. कवी बापू धनवे यांनी आपल्या काव्यमय शैलीत मार्गदर्शन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती तिडके मॅडम यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या प्रगतीचा अहवाल सादर केला.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते कि माझे पक्षकाराने १) श्री.नवनाथ हरिभाऊ थोरात २) श्री.कैलास हरिभाऊ थोरात ३) श्री.साईनाथ हरिभाऊ थोरात, सर्व रा.सावतामाळी चौक, बीड यांचे मालकिचा व ताब्यात असलेला बीड मोहल्ला सावतामाळी चौक येथील नगर परिषद हद्दीचे आतील सर्व्हे नंबर २२२ तरफ बलगुजार मधील प्लॉट ज्यास शहर भूमापन क्रमांक २७५२ पैकी असा मिळालेला आहे व बीड नगर परिषद मालमत्ता क्रमांक जुना स.नं. २२२ तरफ बलगुजार व नवा २-९-६७० असा मिळालेला आहे.

ज्याची लांबी : दक्षिण-उत्तर ७५ फुट, रूंदी : पुर्व- पश्चीम ३७ फूट, एकूण क्षेत्रफळ २७७५ चौरस फूट असून चतुर्सिमा पुर्वेस- सरकारी रस्ता, पश्चिमेस - मुळ मालकाचे क्षेत्रातून सोडलेला २० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - वैजीनाथ नागोराव थोरात यांचा प्लॉट व उत्तरेस: जुन्या मोंढ्याकडे जाणारा रोड, येणेप्रमाणे वर्णन असलेला प्लॉट माझे पक्षकाराने कायम खरेदी घेण्याचा ठराव केला असून विक्रेत्यांनी सदरील प्लॉट निर्विवाद असल्याची खात्री दिली आहे, या उपर सदर प्लॉटमध्ये जर कोणाचे काही हितसंबंध जसे कि इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आममुखत्यारपत्र इ. स्वरूपाचे असतील तर संबंधीतांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ८ दिवसाचे आत योग्य त्या पुराव्यासह खालील पत्त्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप आला नाही तर सदरील प्लॉट निर्विवाद आहे असे समजून माझे पक्षकार सदरील प्लॉटचे कायदेशीर खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणाचा कसलाही आक्षेप चालणार नाही.

सबब हे जाहीर प्रगटन.

-जाहीर प्रगटन देणार-

**ॲड. विजयकुमार मोतीलाल कासट**

कासट कॉम्पलेक्स, सुभाष रोड, बीड

मो.नं. ९४२२७४१०९१


पान १ वरून

## गर्दी करु नका, १ सिलेंडर दीड महिना पुरते

ज्या बातम्या येत आहेत त्यावरुन घाबरुन जाऊन नागरिक गरज नसतांनाही आणि घरी सिलेंडर असतांनाही रिकामे सिलेंडर घेऊन गॅसच्या दुकानासमोर गर्दी करत आहेत. वास्तविक पाहता सरकारने युद्ध सुरु झाल्यापासून नियोजन केले आहे. २५ दिवसाला बुकींगची व्यवस्था केलेली आहे, बुकींग केलेल्या प्रत्येकाला गॅस मिळेल असे सरकार सांगत आहेत, तरी पण लोक उन्हात उभे राहून विनाकारण गर्दी करत आहेत. गरज नसतांना बुकींगसाठी लोक गर्दी करत आहेत. शासन स्तरावर मात्र गॅस वितरणाच्या सर्व यंत्रणेवर काटेकोरपणे लक्ष दिले जात आहे. जिल्ह्यात कुठेही गॅसची टंचाई नाही, पेट्रोल,डिझेलचीही टंचाई नाही. सर्व पेट्रोल पंपांवर ग्राहकांना पेट्रोल मिळत आहे. विनाकारण घाबरुन जाण्याची गरज नाही.

## जिल्ह्यात घरगुती गॅसची टंचाई नाही...

**आम्ही टोल फ्री नंबर जाहीर केलेले आहेत असे जिल्हाधिकाऱ्यांनी आवाहन केले आहे. दवाखान्यांसाठी सुद्धा नियमीत सिलेंडर उपलब्ध करुन दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.**

## विवाहितेवर अत्याचार करुन बांधून ठेवले

तात्काळ पुढाकार घेत पीडित महिलेची सुटका केली. त्यानंतर तिला सुरक्षीत स्थळी नेऊन पोलिसांना या बाबतची माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पिंपळनेर पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य पाहता पोलिसांनी तात्काळ आरोपी वैभव पटेकर याला अटक केली, या घटनेने पिंपळनेर परिसरासह बीड तालुक्यात खळबळ उडाली आहे.

## अल्पवयीन मुलीवर दोन नराधमांकडून अत्याचार

त्यानंतर एका नराधमाने पीडितेचे हातपाय घट्ट बांधले, तोंडात कापडाचा बोळा कोंबला. यानंतर दोन्ही नराधमांनी तिच्यावर अतिशय क्रूरपणे लैंगिक अत्याचार केले. अत्याचारानंतर पीडितेची सुटका करतांना नराधमांनी तिला जीवे मारण्याची धमकी दिली. हा प्रकार कोणाला सांगितल्यास तुला संपवून टाकू असे म्हणून तिला दहशतीखाली ठेवले. धमकीमुळे प्रचंड घाबरलेल्या मुलीने कशीबशी आपली सुटका करुन घर गाठले आणि घडलेला सर्व प्रकार आपल्या आई,वडिलांना सांगितला. पालकांनीही घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी घटनेची दखल घेत आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६४,१२७(२), ३५१(२), ३५२,३(५) आणि बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) २०१२ च्या कलम ४ आणि १७नुसार गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही आरोपी सध्या फरार असून या प्रकरणाचा तपास अंबाजोगाई उपविभागाचे पिंक पथक आणि स.पो.नि. संतोष जाधव करत आहेत.

## गोवऱ्यांचे दर वधारले...

भारताला युद्धाचे चटके बसत असून इंधन टंचाईमुळे, गॅसच्या तुटवड्यामुळे लोकँ हवालदिल झाले आहेत.

महाराष्ट्राही गॅसची टंचाई असून लोकँ पॅनिक झाले आहे, गॅसऐवजी इंडक्शन, इलेक्ट्रिक शेगड्या यांचा वापरक करत आहेत. मात्र मोठे व्यवसाय, हॉटेल मालक यांनाही सिलेंडरचा तुटवडा भासत असून अनेकांनी चुलीकडे मोर्चा वळवला. तर काहींनी आता स्वंपाकासाठी पारंपारिक मार्ग निवडला आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे गॅस सिलिंडरच्या वितरणावरती निर्बंध आले असल्याने आता शेणाच्या गोव-यांना मागणी वाढली आहे.

पान ६ वरून

## चोरलेल्या तीन लाखांच्या तीन मोटार सायकली जालना जिल्ह्यातून जप्त

डीबी पथकाने जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील वाटूर फाटा परिसरात छापा टाकून तीन चोरीच्या मोटारसायकली मोठ्या शिताफीने जप्त केल्या. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड तसेच पोलीस कर्मचारी महेश चव्हाण, सुनिल गवळी, आसलम शेख, गायकवाड आणि जायभाये यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पोलिसांनी जप्त केलेल्या मोटारसायकलींमध्ये आरवनफाईव्ह व हिरो कंपनीच्या मोटारसायकलींचा समावेश असून त्यांची एकूण किंमत ३ लाख रुपयांच्या घरात असल्याचे सांगितले जात आहे.दरम्यान, पुढील काळातही मोटारसायकल चोरीच्या इतर प्रकरणांचा तपास करून आणखी वाहनांचा शोध लावण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.या कारवाईमुळे माजलगाव शहरातील नागरिकांकडून पोलिसांच्या सतर्कतेचे आणि कार्यतत्परतेचे कौतुक करण्यात येत आहे.

## तुळजाभवानी अर्बनची संवेदनशील भूमिका

यानंतर कर्जासाठी गहाण ठेवलेले सोन्याचे दागिने त्यांच्या वारसदार नरवडे किशोर गणेश यांच्याकडे अधिकृतपणे सुपूर्त करण्यात आले. या वेळी तुळजाभवानी अर्बनचे विभागीय अधिकारी सिद्धेश्वर शिंगणे आणि शाखा व्यवस्थापक प्रकाश फपाळ यांच्या हस्ते दागिने सुपूर्त करण्यात आले. संस्थेच्या या निर्णयामुळे मृत खातेदाराच्या कुटुंबाला मोठा आर्थिक दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. तसेच सोसायटीकडून सदस्यांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विमा योजनांचे महत्त्वही या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

## ऊसाच्या फडात वयोवृद्ध वारकऱ्याचा

या आजारामुळे ते मानसिक तणावात असल्याची चर्चा गावात आहे.आठदिवसांपूर्वीही त्यांनी स्वतःवर ब्लेडने वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, सून आणि एक विवाहित मुलगी असा परिवार आहे. शेतकरी दिलीप देशमुख यांनी या घटनेवर संताप व्यक्त केला आहे. शेजारील शेतकरी सुरेश बुरगे यांनी शेत रस्ता अडवल्यामुळे त्यांचा ऊस कारखान्याला जाऊ शकला नाही. 'रस्ता मोकळा करण्यासाठी तहसीलदारांकडे अर्ज देऊनही प्रशासनाने वेळेत कारवाई केली नाही. रस्ता मिळाला असता तर ऊस आधीच तुटला असता आणि ही दुर्दैवी घटना घडली नसती,' असे देशमुख यांनी म्हटले आहे.

## सेवा निवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक

उपाधीक्षक कार्यालय माजलगाव व बीड येथे प्रामाणिकपणे व कर्तव्यदक्षतेने सेवा बजावली. सन २०१४ मध्ये ते पोलीस सेवेतून सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या निधनाने पोलीस दलाने एक प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ आणि अनुभवी सहकारी गमावला आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगी व तीन मुले असा परिवार असून त्यापैकी तीनही मुले पोलीस दलात कार्यरत आहेत. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी बीड शहर पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी बीड पोलीस दलाच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली व शोक संदेश व्यक्त केला. ठाकूर कुटुंबियांच्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## विनयभंगाचा गुन्हा मागे घेण्यासाठी पीडितेच्या घरावर दगडफेक

दिशेने मोठ्या प्रमाणावर दगडफेक केली. या हल्ल्यात पीडितेच्या सासूच्या पायाला आणि वहिनीच्या मांडीला गंभीर इजा झाली आहे.हा सर्व प्रकार आरोपींच्या स्वतःच्या आणि शेजारील सुलतान व युसुफ यांच्या घरावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. पुराव्यानिशी तक्रार देऊनही पोलिसांनी योग्य कलमे लावून गुन्हा दाखल न केल्याने संताप व्यक्त केला जात आहे. पीडित मुलीच्या आईने याबाबत पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आम्ही तक्रार द्यायला गेलो असता, आरोपींना वाळू माफियांचे संरक्षण असल्याने पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे एफआयआर न घेता केवळ एनसी ( छे. १२५/२०२६) नोंदवली. पोलिसांच्या या भूमिकेमुळे पीडित कुटुंबाच्या जीविताला आता मोठा धोका निर्माण झाला आहे. घरात घुसून मारहाण आणि दगडफेक करणाऱ्या आरोपींवर तात्काळ कठोर गुन्हा दाखल व्हावा.वाळू माफियांच्या दबावाखाली काम करणाऱ्या संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांचा सीडीआर तपासणी करून चौकशी व्हावी. पीडित कुटुंबाला पोलीस संरक्षण मिळावे अशी मागणी अर्जदार महिलेने पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेनाद्वारे केली आहे.

## वनविभागाने ३ महिन्यांपासून कोंडलेल्या २१ बिबट्यांचे पुनर्वसन

अरुंद पिंजऱ्यात कैद करून ठेवले होते पिंजऱ्यात हालचाल नाही सतत कोंडमार घाण वास उन्हाने गरम झालेली पिंजरे यामुळे त्रस्त बिबटे पिंजऱ्याला धडका मारून जखमी होऊन आक्रोश करत मरनासुन्न होते. तातडीने बिबट्यांचे पुनर्वसन करण्यासाठी बीड जिल्ह्यातील जीवदया फाउंडेशनने केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंद्र यादव वनमंत्री गणेश नाईक यांच्या कडे पाठपुरावा केला होता.वाढत्या उन्हामुळे आणि मादी गर्भवती बिबट्यांना पिंजऱ्यात पिल्ले झाल्यास बिबट्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकते प्राणी मित्र नितीन आळकुटे यांनी बिबट्यांची वेदनादायी संघर्ष कहाणी जगासमोर मांडली देश विदेशातील पर्यावरण वन्यजीव संघटना प्राणी संस्था या घटनेची चिंता व्यक्त करत सोशल मीडिया ट्विटरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त करत होते राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय वर्तमानपत्रांनी कव्हरेज केले होते देशभरात या घटनेची चर्चा झाल्यानंतर केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने या घटनेची शहानिशा करण्यासाठी जीवदया फाऊंडेशन कडून पुरावे घेऊन राज्य वनविभागाच्या प्रशासनाला तात्काळ निर्देश दिले. वनविभागाच्या तीन चार महिन्यांपासून पिंजऱ्यात कोंडलेले वीस बिबटे स्थलांतरीत केल्याचे व एक बिबट निसर्गमुक्त करण्यात आले आहे असे अहिल्यानगर उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल अहिल्यानगर यांनी जीवदया फाऊंडेशन कडा यांच्या कडे पुनर्वसन झाल्याचे पत्र दिले बिबट्यांना कैद करण्या अगोदर पायाभूत सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे मुक्या प्राण्यांना बोलता येत नसल्याने त्याना दिर्घ काळ पिंजऱ्यात कैद करने चुकीचे आहे बिबट्या हा उष्ण रक्ताचा प्राणी उन्हामुळे त्याचे पिंजऱ्यातील हाल पाहून मन हेलावून गेले होते एक महिन्यांपासून प्रयत्न चालू होते देशभरातून पर्यावरण वन्यजीव प्रेमींनी सहकार्य केले असे जीवदया फाऊंडेशन चे प्राणी मित्र नितीन आळकुटे यांनी सांगितले.

## सराफांची जिल्हास्तरीय कमिटी स्थापन

सुवर्णकार असोसिएशनच्या वतीने नवनीत काँवत, शिवाजी बंटेवाड यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहनराव जगताप,तर प्रमुख पाहुणे म्हणून राजेश रोकडे, बाबुराव पोटभरे, गणेश बेंद्रे, वैभव शहाणे, माधव निर्मळ, मंगेश लोळगे, अनंत रुद्रवार, प्रभाकर कुलथे, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम बापू येवले तालुकाध्यक्ष उमेश मोगरेकर, तालुकाध्यक्ष पांडुरंग उगले, या. समाज कल्याण सभापती कल्याण आबुज, आयपीएस अधिकारी राहुल कुमार तसेच पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ आदी मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्यास माजलगाव परिसरातील सुवर्णकार व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यापाऱ्यांना कायदेशीर बाबींची माहिती मिळाल्याने भविष्यातही अशा मार्गदर्शक मेळाव्यांचे आयोजन करावे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.अध्यक्षीय समारोप करताना मोहनराव जगताप यांनी सराफ व्यापाऱ्यांनी आपला व्यवसाय करीत असताना डोळ्यात तेल घालून अत्यंत सावध राहून हा व्यवसाय करावा आणि आधुनिक तंत्राचा वापर करावा असे आवाहन यावेळी केले. प्रास्ताविक सराफ सुवर्णकार असोसिएशनचे माजलगाव तालुका अध्यक्ष रामराजे रांजवण, यांनी केले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, गजानन बोकन यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण झोडगे गोविंद गोचडे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सराफा सुवर्णकार असोसिएशन सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

## पाटोदा येथे लोकअदालतीत ९७ प्रकरणे निकाली

आयोजनासाठी पाटोदा न्यायालयातील कर्मचारी पी. पी. कुलकर्णी, बी. ए. घुले, आर. एस. काळे, साक्षी दासखेडकर, सी. ए. कुलकर्णी, आर. डी. राक्षसभुवनकर, के. एम. झवेरी, आर. के. शिंदे, व्ही. बी. वरकटे, वैभव शिरसाट, अजय मोहिते, एम. के. गवळी, सखाराम चव्हाण आदींनी काम पाहिले.तसेच पाटोदा वकील संघातील सर्व विधीज्ञांनीही लोकअदालतीच्या यशस्वीतेसाठी मोलाचे सहकार्य केले. लोकअदालतीमुळे प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली निघून पक्षकारांचा वेळ व खर्च वाचत असल्याने नागरिकांनी या उपक्रमास चांगला प्रतिसाद दिला.

## जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओ थेरपी, माजलगावचा १०० टक्के निकाल

निर्माण झाले आहे.सविस्तर वृत्त असे की,महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण होत आपले शैक्षणिक प्रशिक्षण पूर्ण केले असून ते आता डॉक्टर म्हणून समाजातील रुग्णांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहेत. ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचने मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद मानले जात आहे.या यशानिमित्त महाविद्यालयात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशामागे महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांची मेहनत कारणीभूत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा मंगलाताई प्रकाश सोळंके यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांना घडविणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच आरोग्यसेवेच्या क्षेत्रात संवेदनशीलता, कौशल्य आणि समर्पणाने काम करण्याचे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले.जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या या उल्लेखनीय यशामुळे माजलगाव शहरासह बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल झाले आहे. पुढील काळातही अशाच प्रकारे गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन आरोग्य क्षेत्रासाठी सक्षम आणि कुशल फिजिओथेरपिस्ट घडविण्याचा संस्थेचा संकल्प असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक १५ मार्च २०२६ पान -३

## एकूण एक टपऱ्यावर तंबाखूजन्य पदार्थाची विक्री तंबाखू नियंत्रण पथक बरखास्त केले आहे काय ?

### पोलिसांच्या कारवाईने गुटक्याचे भाव वाढले ?

स्थानिक गुन्हे शाखा असो की पोलीस ठाण्याचे अधिकारी असोत, यांनी बेकायदेशीर गुठक्यावर कारवाया केल्या. अनेकदा मोठे साठे जप्त केले. परंतु गुटखा काही बंद झाला नाही. उलट पाच रुपयाला मिळणारा गुटखा सात ते आठ रुपयांवर गेला आहे. पोलिसांच्या कारवाईने गुटख्याचे भाव मात्र वाढले ?. पोलिस आणि संबंधित यंत्रणेला जर गुटखाबंदी राबवायचेच असेल तर जिल्ह्यात कोठून गुटका येतो, तो कोण विकतो, त्याचे वितरण कोण करतो ? याची माहिती काढून कारवाया चालवल्या तर गुटखा बंद झाले शिवाय राहणार नाही. नव्हे लपून छपून देखील विक्री करण्याचे धाडस होणार नसल्याचे मत या संदर्भात व्यक्त करण्यात आले.

बीड दि १४(प्रतिनिधी) - बीड शहरामध्ये नव्हे तर अख्या जिल्ह्यात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री करत कोटपा २००३ कायद्याचे सर्रास उल्लंघन होत यासंदर्भात कारवाईची जबाबदारी असलेले जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथक मात्र कसे काय स्वस्तावले ? पान टपरी ही फक्त पानासाठी असताना सर्रासपणे तंबाखूजन्य पदार्थाची नव्हतं सर्व प्रकारच्या गुटखची विक्री होत असताना हे पथक

का कारवाई करत नाही ? की पथकाचेच विसर्जन करण्यात आले आहे असा सवाल नागरिक करू लागले आहेत .

तंबाखूजन्य पदार्थाची विक्री बेकायदेशीरपणे करणाऱ्या वर कारवाईसाठी जिल्हा रुग्णालय महसूलचे अधिकारी आणि पोलीस यांचा समावेश असलेल्या पथकाने मागील काही महिन्याखाली बीड शहरासह जिल्ह्यात पान टपऱ्यांची तपासणी करून दंडात्मक कारवाईला वेग दिला होता. यामुळे टपरी चालकांनी चांगलीच धास्ती घेतली होती. परंतु गेली वर्षभरात अशा कारवायासमोर आल्या नाहीत. तंबाखूजन्य पदार्थांची सर्रास विक्री होत असताना तसेच प्रत्येक टपरीवर सर्व प्रकारचे बेकायदेशीर गुटखा विक्री होत असताना दखल घ्यायला कोणी तयार नाही.सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक अथवा शासकीय, निमशासकीय कार्यालयाच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची विक्री अथवा सेवन किंवा साठवण होत असल्यास जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय येथे तक्रार नोंदवून जिल्हा तंबाखू मुक्त करण्याच्या या अभियानास सहकार्य करावे असे, आवाहन आवाहन देखील अनेकदा करण्यात आले होते. यात किती लोकांनी तक्रारी केल्या हे समोर आले नाही आणि पथकाची तर काहीच कारवाई नाही यामुळे हे पथक विसर्जित केले आहे की काय असा सवाल अनेकांना पडला आहे तेव्हा जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी या बाबीकडे लक्ष केंद्रित करून एकदा कारवाई हाती घ्यावी असे आवाहन देखील सुज्ञ नागरिकांमधून करण्यात आले.

## आ.सौ. नमिता मुंदडा यांच्या हस्ते महिला बचत गटांना धनादेश वाटप

अंबाजोगाई दि १४ (प्रतिनिधी)-छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अंतर्गत लोखंडी सावरगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य शिबिरास आमदार नमिता मुंदडा यांच्या हस्ते महिला बचत गटांना धनादेशाचे वाटप करण्यात आले.

यावेळी आ. सौ. मुंदडा यांनी नागरिकांशी संवाद साधला.

शिबिरादरम्यान नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपले महसुली अर्ज सादर केले. आमदार नमिता मुंदडा यांनी स्वतः अर्जांची दखल घेत, संबंधित विभागांना सूचना दिल्या आणि नागरिकांना योग्य मार्गदर्शन केले. या प्रसंगी आ. नमिता मुंदडा यांच्या हस्ते विविध महिला बचत गटांना धनादेशांचे वाटप करण्यात आले. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे हेच शासनाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. सामान्य माणसाला साध्या कामासाठी तहसील किंवा जिल्हा कचेरीत वारंवार चकरा माराव्या लागू नयेत, यासाठी महसूल समाधान शिबीर हे एक प्रभावी माध्यम ठरत आहे. शासकीय यंत्रणा जेव्हा स्वतः जनतेच्या दारात येते, तेव्हा खऱ्या अर्थाने पारदर्शक कारभार सिद्ध होतो. गावपातळीवर अशा उपक्रमांमुळे लोकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचत असल्याचा आनंद वाटतो. असेही त्या म्हणाल्या. तर या शिबिरामुळे अनेक प्रलंबित प्रश्न निकाली निघाल्याने लोखंडी सावरगाव आणि परिसरातील नागरिकांनी आ. नमिता मुंदडा व प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## सहा वर्षांच्या अधियान करीम शेखचा रोजा संपन्न

अंबाजोगाई दि १४ (प्रतिनिधी) - पवित्र रमजान महिन्यात उपवास, संयम आणि अल्लाहप्रती भक्तीभाव यांना विशेष महत्त्व असते. मोठी माणसेच नव्हे तर लहान मुलेही या पवित्र महिन्यात श्रद्धेने रोजा पाळताना दिसतात. अंबाजोगाई येथील अवघ्या ६ वर्षांच्या अधियान करीम शेख या चिमुकल्याने कडक उन्हातही पूर्ण दिवस रोजा ठेवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

रमजान महिन्याचे महत्त्व समजून घेत अधियानने आनंदाने आणि उत्साहाने हा रोजा पूर्ण केला.रमजान हा आत्मसंयम, सहनशीलता आणि परोपकार शिकवणारा महिना मानला जातो. अशा पवित्र काळात लहान मुलांमध्येही धार्मिक संस्कार आणि श्रद्धा वाढताना दिसत असल्याचे या प्रसंगातून स्पष्ट झाले. अधियानच्या कुटुंबीयांनीही त्याच्या या निर्णयाचे स्वागत करत त्याला प्रोत्साहन दिले. ''इतक्या लहान वयात त्याने इतका मोठा रोजा ठेवला, याचा आम्हाला अभिमान आहे,'' अशी भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली.अवघ्या सहा वर्षांच्या या चिमुकल्याने दाखवलेली श्रद्धा आणि संयम पाहून अनेकांनी त्याला शुभेच्छा देत त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली.

### रमाकांतबापू मुंडे यांनी घेतले ढोक महाराजांचे आशीर्वाद

केज दि १४(प्रतिनिधी) - शहरापासुन जवळच असलेल्या बीड रोड वरील ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांनी आयोजित केलेल्या भगवान श्रीकृष्ण मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्या निमित्त १०८ कुंडी भव्य महाविष्णु याग,यज्ञ कार्यक्रम दि.११ मार्च बुधवार पासुन सुरु झाला असन गुरुवार दि१२मार्च पासुन ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून संगीत रामकथा सुरु झाली .तसे यावेळी उपस्थित राहून भाजपाच्या महीला अध्यक्षा तथा माजी जि.प.सदस्या सौ. उषाताई मुंडे व भाजपाचे जेष्ठ नेते रमाकांत बापू व मुंडे परिवाराने पुष्पहार घालून ढोक महाराज यांचे आशिर्वाद घेतले.

## शिवनेरी परिसरात पोलीस व महसूल च्या पथकाकडून धाड मिळून आला ७३ हजार रुपयाचा बेकायदेशीर सिलेंडर साठा

बीड दि १४( (प्रतिनिधी) - अमेरिका इराण युद्ध पेटल्यापासून इंधनाची टंचाई भासणार या जाणिवेने प्रत्येक नागरिक आपापल्या परीने सोय करून ठेवू लागला आहे. पेट्रोल डिझेल महागणार किंवा मिळणार नाही म्हणून पाच-दहा लिटर पेट्रोलची खरेदी करताना दुचाकी स्वार देखील दिसून येत आहेत. यातच डिझेल देखील खरेदी करण्यासाठी पेट्रोल पंपावर गर्दी होताना दिसून येते. असे असतानाच घरगुती गॅस संदर्भात तर अप्रत्यक्ष टंचाई जाणव लागली असल्याने घरात गॅस असताना देखील व तो पंधरा दिवस जाईल असे स्पष्ट दिसत असताना गॅसला नंबर लावण्यासाठी रांगा लावणे चालवले. असे असतानाच एका बहादराने तर थेट आपल्या घरात भरलेल्या गॅस टाक्याच साठवून ठेवल्या . बीड शहरातील शिवनेरी नगर परिसरात असलेल्या एका घरामध्ये मोठ्या प्रमाणात घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडरचा अवैध साठा असल्याची माहिती समजल्यानंतर शनिवारी १४ मार्च रोजी पेठ बीड पोलिस व महसूलच्या पथकाने छापा मारला असता सुमारे ७३ हजार ५५० रुपये किमतीच्या सिलेंडर साठा मिळून आला. या संदर्भात एकावर कारवाई करण्यात आली असल्याचे सूत्रांनी सांगितले

आखाती देशातील युद्धाचे परिणाम भारतात जाणव लागले तसे राज्यातही गॅस सिलेंडरचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर जाणू लागला असून ग्राहक गॅस कंपनीच्या बाहेर लांबच्या लांब रांगा लावताना चे चित्र समोर दिसू लागले आहे.सिलेंडर घेण्यासाठी ऑनलाईन नंबर वर बुकिंग करूनच सिलेंडर मिळत होते. शिवाय



मागील तेव्हा मागील त्याला घरपोच गॅस मिळत होता परंतु सर्वच कंपन्यांनी ऑनलाइन सिलेंडर देणे बंद केले यामुळे नागरिकांना नोंदणीसाठी नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बीड शहरात काही ठिकाणी जादा दराने सिलेंडर विक्री होत असून काही साठेबाज तर सिलेंडरचा काळाबाजार करत असल्याची देखील लोक बोलत आहेत यातच एका घरावर मारलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेल्या गॅस टाकी मिळाल्या. प्रशांत एकनाथ सुपेकर (वय ३७), निरीक्षण अधिकारी, पुरवठा विभाग, तहसील कार्यालय बीड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अजय मोहनराव घोडके (वय ३६, रा. शिवनेरीनगर, इमामपुर रोड, बार्शी नाका, बीड) याने स्वतःच्या घराच्या पोर्चमध्ये घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडरचा अवैधरित्या साठा करून ठेवला होता.दि. १४ मार्च २०२६ रोजी शिवनेरीनगर (गवळगल्ली) परिसरात ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी केलेल्या पंचनाम्यात इंडेन, भारत गॅस व एच.पी. गॅस कंपनीचे भरलेले व रिकामे असे अनेक सिलेंडर जप्त करण्यात आले. या सर्व सिलेंडरची अंदाजे किंमत ७३ हजार ५५० रुपये इतकी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी स्पीड बिल पोलीस ठाण्यामध्ये गूरनं ७८/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम २८७, २८८ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती सुत्राकडून समजली. सदरची छापा कारवाई प्रभारी अधिकारी सपोनि नित्यानंद उबाळे, हेड कॉन्स्टेबल -नितीन राठोड,पोलिस अंमलदार-कल्याण जाधवपो,लीस अंमलदार- अंकुश राठोड होमगार्ड - पठाणपु,पुनिरीक्षण अधिकारी तहसील कार्यालय सह पोलीस व पुरवठा विभागाने केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बारगळ करीत आहेत.

## पटाया (थायलंड) येथे आधार मल्टीस्टेटला आंतरराष्ट्रीय सन्मान - ३८ वा पुरस्कार प्राप्त

माजलगाव दि १४ (प्रतिनिधी)- आर्थिक साक्षरता, बचत संस्कृती आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याच्या ध्येयाने कार्यरत असलेल्या आधार मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेच्या कार्याचा गौरव आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात आला आहे. थायलंड मधील पटाया शहरातील हॉटेल माईंड रिसॉर्ट येथे आयोजित विशेष कार्यक्रमात अखिल भारतीय भिक्खू संघ भारताचे कार्याध्यक्ष डॉ. उपगुप्त महाथेरो तसेच एस. के. ग्रुप (थायलंड) चे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक डॉ. निक योशिओका यांच्या शुभहस्ते आधार मल्टीस्टेट संस्थेला आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

थायलंड येथे मिळालेला हा सन्मान आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानाचा पुरस्कार ठरला असून, यापूर्वी संस्थेला मिळालेल्या ३७ पुरस्कारांनंतर हा आधार परिवाराचा ३८ वा पुरस्कार ठरला आहे. दरम्यान, याच कार्यक्रमात अखिल भारतीय भिक्खू संघ भारताचे कार्याध्यक्ष डॉ. उपगुप्त महाथेरो यांना त्यांच्या धार्मिक, सामाजिक आणि आध्यात्मिक कार्याची दखल घेऊन ''बेस्ट धर्मगुरू इन इंडिया'' हा विशेष सन्मान प्रदान करण्यात आला.डॉ. उपगुप्त महाथेरो दरवर्षी महाराष्ट्र, भारत तसेच श्रीलंका, थायलंड, म्यानमार, जपान आदी देशांमध्ये बौद्ध धर्माशी संबंधित धार्मिक सहलींचे आयोजन करतात. या माध्यमातून बौद्ध संस्कृती, इतिहास आणि आध्यात्मिक परंपरेची माहिती हजारो अनुयायांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य ते करीत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय योगदानामुळे त्यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला.या कार्यक्रमामुळे भारत आणि थायलंड यांच्यातील धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होण्यास मदत होणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.



## विद्यार्थ्यांचा प्रगती संदर्भात केएसपी विद्यालयात पालक मेळावा संपन्न

बीड दि १४ (प्रतिनिधी)- शहरातील कालिका नगर येथील के.एस.पी. विद्यालयात शैक्षणिक वर्षाच्या अखेरेस पालकांना आपल्या पाल्या विषयीची प्रगती व सुधारणा या विषयी चर्चा करण्यास यावी या हेतुने १२ मार्च रोजी हा पालक मेळावा घेण्यात आला.

जेव्हा शिक्षक आणि पालक एकत्र येतात, तेव्हा विद्यार्थ्याच्या घराकडे आणि शाळेतील अशा दोन्ही बाजूंचा विचार होतो. यामुळे मुलांच्या मानसिक आणि शैक्षणिक विकासाला योग्य दिशा मिळते. मेळाव्यामुळे पालकांचा शाळेवर आणि शिक्षकांवर विश्वास वाढतो. शाळा ही केवळ अभ्यासाची जागा नसून ती मुलांच्या भविष्यासाठी काम करणारी संस्था आहे, ही भावना दृढ होते. पालकांना मुलांच्या अभ्यासाची पद्धत समजल्यामुळे, ते घरीदेखील मुलांकडून योग्य प्रकारे अभ्यास करून घेऊ शकतात. यामुळे मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा होते. यावेळी विद्यार्थ्यांचे वर्तन, छंद आणि सुधारणेच्या संधींवर चर्चा करण्यात आली. तसेच पालकांमधील सौ. देवकते मॅडम, सौ. दहिफळे मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख श्री. ऋषिकेशजी शेळके, एमॅच्युअर खो-खो असोसिएशन बीडचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शेळके, मार्गदर्शक सौ.अंजलीताई शेळके, पालक प्रतिनिधी जगन्नाथ लांडगे, अंजली तिडके, अनिता जावळे, सौ. देवकते, सौ. दहिफळे शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पालक यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला

## आता पेटवा चुली व तंदूर भट्ट्या नवनाथ शिराळे यांचे आवाहन

बीड दि १४ (प्रतिनिधी) - अमेरिका व अहिराणीच्या युद्धाचे परिणाम आपल्या देशात जाणवत आहेत. सध्या देशांमध्ये सिलेंडरचा तुटवडा भासत आहे असे काही अधिकारी यांनी सांगितले . तेव्हा देशामध्ये गॅस सिलेंडरचा तुटवडा भासत असल्याचे चित्र दिसत असले तरी घाबरण्याचे कारण नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी भाई यांच्या पुढाकाराने हे युद्ध थांबेल असे मत बार संघटना माजी अध्यक्ष तथा भाजपाचे नेते नवनाथ अण्णा शिराळे यांनी व्यक्त करून तोपर्यंत बारचालकांनी व खानावळ वाल्यांनी चुली व तंदूर भट्ट्या पेटवाव्यात असं आवाहन केले.



प्रसिद्धी पत्रकात पुढे नमूद केले की देशामध्ये गॅस सिलेंडरचा तुटवडा भासत आहे पण काही दिवसांनी आपल्याला गॅस आपल्याला आपल्या भारत देशामध्ये व सर्व ठिकाणी मुबलक उपलब्ध होणार आहेत असे आपले भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी भाई मोदी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा ताई पवार, पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांनी आपणास माध्यमाच्या माध्यमातून सांगितले आहे की चार दिवस गॅस सिलेंडरची टंचाई देशामध्ये भासेल परंतु येणाऱ्या भविष्य काळामध्ये आपल्याला मुबलक असे गॅस सिलेंडर उपलब्ध होणार आहेत तरी ही गैरसोय होऊ नये या करता म्हणून आपण लाकडाच्या चुली व तंदूर भट्ट्या पेटवाव्यात शासनाला व प्रशासनाला आपण आपल्या ग्राहकांना ग्राहकांना सेवा कशी देता येईल आपल्याला आपल्या जनतेची होणारी गैरसोय दूर होईल म्हणून शासन प्रशासन यांना आपले सहकार्य मिळेल . यासाठीआपण सहकार्य करावे असे आव्हान आवाहन अध्यक्ष बार संघटना माजी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून जनतेला केले आहे.

## पैठण येथे अमृताश्रम स्वामी महाराज वारकरी भूषण पुरस्काराने सन्मानित

बीड दि १४ (प्रतिनिधी)- श्री क्षेत्र पैठण येथे पंचपर्वश्रेणी व नाथ षष्ठी उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात संत एकनाथ मिशन व नाथ वंशज योगीराज महाराज गोसावी यांच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.यामध्ये नवगण राजुरी येथील अमृताश्रम स्वामी महाराज यांनाही श्री गुरु चैतन्य महाराज देगलूरकर, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर व प्रकाश महाराज जवंजाळ यांच्या हस्ते नाथसंस्थानाधिपती भैय्यासाहेब महाराज यांच्या नावे राज्यस्तरीय वारकरी भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.याप्रसंगी सुभाष शेठ क्षीरसागर, शेखरबुवा जांभूळकर, उदबोध महाराज पैठणकर, प्रसाद देव चासकर, जालिंदर वाबळे वासुदेकर, पवन महाराज (मध्यप्रदेश), विठ्ठल महाराज बहिर राजुरीकर, सागर वनगुजरे, डॉ. दिलीप उदगीरकर, अंकुश घोडके, मकरंद महाराज शास्त्री, वरद जोशी लिंबागणेशकर, दत्ता गुरु पोहेकर, नागेश कुलकर्णी, रामराजे राक्षसभुवनकर, नगराध्यक्ष भूषण कावसानकर, बबन देव क्षीरसागर उपस्थित होते. दरम्यान यावर्षी या कार्यक्रमात इतरही विविध श्रेणीतील पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये प्रबोध मार्तंडः प्रमोद महाराज जगताप, भानुदास एकनाथः संजय महाराज पाचपोर, स्वर मार्तंडः रघुनाथ खंडाळकर, ताल मार्तंडः पांडुरंग पवार तसेच सेवा पुरस्कारः संजय बालवडकर (पुणे) यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

## मातावळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनींना अकरा सायकलीचे वाटप

आष्टी दि १४ (प्रतिनिधी) - तालुक्यातील मातावळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू व हुशार विद्यार्थिनींना ग्रामीण आरोग्य प्रकल्प आरोळे हॉस्पिटल जामखेड आणि झेप फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकल्प संचालक डॉ. रवीदादा आरोळे, संचालिका डॉ.शोभाताई आरोळे झेप फाउंडेशनचे प्रसाद झावरे, रेश्मा सांबरे तसेच सुरेखा सोनवणे, मधुकर वाळुंजकर,मेषक गुरम,अमेरिकन डॉ.सियाना यांच्या प्रमुख उपस्थितीत ११ सायकलींचे वाटप करण्यात आले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मातावळी ही डोंगराळ भागांमध्ये असणारी इयत्ता १ ते ७ वी पर्यंतचे वर्ग असणारी शाळा असून या शाळेत ७४ मुले व ९१ मुली असे एकूण १६५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये मुलींचे प्रमाण जास्त असून वनवेवाडी, खंडोबावस्ती,पोकळेवस्ती येथून ३ ते ३.५ किलोमीटर अंतरावरून मुली शाळेमध्ये येतात या मुलींना येण्या जाण्यासाठी सोय व्हावी या उदात्त हेतूने ग्रामीण आरोग्य प्रकल्प जामखेड व झेप फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आज गरजू व होतकरू विद्यार्थिनींना ११ सायकलीचे मोफत वाटप करण्यात आले. समाजाच्या सहभागातून या शाळेत सीसीटीव्ही कॅमेऱ्याची सोय केलेली आहे. प्रशस्त क्रीडांगण,प्रत्येक वर्गामध्ये फॅन, एलईडी टी.व्ही, ओव्हरहेड प्रोजेक्टर स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादी भौतिक सुविधाणे संपन्न असणारी शाळा मातकुळी केंद्रामध्ये




गुणवत्तेच्या बाबतीतही अग्रेसर आहे. शाळेमध्ये आलेले नवीन शिक्षक विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी सातत्याने प्रयत्न करत असून ५ वी नवोदय विद्यालय परीक्षा, ४ थी शिष्यवृत्ती, ५ वी शिष्यवृत्ती, ७ वी शिष्यवृत्ती परीक्षा तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी सातत्याने शाळेमध्ये घेतली जात आहे. तसेच सामान्य ज्ञान व पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमावर आधारित *कोण बनेगा ज्ञानपती* हा शाळेचा नाविन्यपूर्ण उपक्रम दर शनिवारी राबवण्यात येत आहे. .शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष बाळासाहेब बांगर यांनी ग्रामीण आरोग्य प्रकल्प व मातावळीचे ऋणानुबंध जुनेच असून कोरोना काळामध्ये मातावळी गावाने ग्रामीण आरोग्य प्रकल्पासाठी ४० क्विंटल धान्य देऊन रुग्णांना सहकार्य केल्याचे यावेळी सांगितले तसेच आरोळे हॉस्पिटलने उपकाराची जाणीव या भावनेतून शाळेतील विद्यार्थिनींना ११ सायकली दिल्याबद्दल प्रकल्प संचालकाचे शाळेच्या व ग्रामस्थांच्या वतीने ऋण व्यक्त केले.

ज्येष्ठ प्राथमिक पदवीधर शिक्षक गोरक्षनाथ लाड यांनी आपल्या प्रास्ताविकात झेप फाउंडेशन आणि ग्रामीण आरोग्य प्रकल्प जामखेड हे मुलींच्या शिक्षणासाठी अतिशय सकारात्मक असल्यासंदर्भात प्रशंसा केली यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंबादास विष्णू बांगर, माजी अध्यक्ष बाळासाहेब बांगर, उपसरपंच राजेंद्र बांगर, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य बाळासाहेब वनवे, प्रवीण बांगर,अंबादास वनवे, बबन वनवे, बाबासाहेब बांगर, सदाशिव वनवे, लक्ष्मण वनवे, रामदास वनवे, आजिनाथ बांगर, कारभारी वनवे, अंबादास शेळके, अशोक पोकळे, हनुमंत बनसोडे, प्रकाश यादव, माता पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक भागवत शेकडे, गोरक्षनाथ लाड, बाळासाहेब डोके, दत्ता झांजे, शिक्षिका सुनीता महाजन, उषा मोराळे, वर्षा मोटे, सुनिता बांगर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गोरक्षनाथ लाड यांनी तर उपस्थिताचे आभार मुख्याध्यापक भागवत शेकडे यांनी मानले.

## आठवीतील अल्पवयीन व बारावीत शिक्षण घेणाऱ्या केज तालुक्यातील दोन गावातील दोन मुली बेपत्ता

केज दि १४ (प्रतिनिधी)-राहून राहून केज तालुक्यातून तरुणी बेपत्ता होण्याचे प्रकार घडत आहेत अशातच केज तालुक्यातील दोन गावांमधून दोन तरुणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे काही दिवसा खालीच महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या दोन तरुणी बेपत्ता झाल्या त्याचा पोलीस तपास करीत असतानाच पुन्हा आठवीच्या वर्गात शिक्षण घेणारी एक १४ वर्षीय अल्पवयीन व बारावीच्या वर्गात शिक्षण घेणारी १९ वर्षीय मुलगी बेपत्ता असल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार तालुक्यातील एका गावातील इयत्ता आठवीत शिक्षण घेणारी १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी बुधवार, दि. ११ मार्च रोजी मध्यरात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास घरातून बेपत्ता झाली. संबंधित मुलगी आई जवळ झोपलेली असताना रात्री तिचे वडील शेतातील पिकांची राखण करून घरी परतले असता मुलगी घरात




नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर कुटुंबीयांनी गावात तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला ; मात्र मुलगी कुठेही आढळून आली नाही. याप्रकरणी मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध अज्ञात कारणासाठी अपहरण केल्याचा गुन्हा केज पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, दुसरी घटना आणखी एका गावात . दि.२८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० साडेपाच वाजण्याच्या सुमारास १९ वर्षीय तरुणी शेतमजुरांचे मजुरीचे पैसे देण्यासाठी गावात गेली होती. मात्र त्यानंतर ती परत घरी आली नाही. संबंधित तरुणीने नुकतीच बारावीची परीक्षा दिलेली असल्याची माहिती मिळाली आहे.कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला असता ती कुठेही आढळून न आल्याने तिच्या वडिलांनी केज पोलिस ठाण्यात मुलगी हरवल्याची तक्रार दाखल केली आहे. या दोन्ही प्रकरणांचा तपास पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम करीत आहेत. मागील काही दिवसा खालीच असंच दोन तरुणी बेपत्ता झाल्या यासंदर्भात केज पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल होते यानंतर या दोन घटना समोर आल्या आहेत मुली बेपत्ता होण्याचे प्रकार केज तालुक्यात घडत असल्याने पालक वर्गामध्ये देखील चिंता व्यक्त केली जात आहे.

# संपादकीय

## 'रील्स'ची नशा आपला घात करणार

आम्ही बाग, बसस्टँड, रेल्वे स्टेशन, वरिष्ठ नागरिक कट्टा, अशा सार्वजनिक ठिकाणी असता किंवा प्रवासात असता. त्यावेळी बाजूची व्यक्ती आपला स्मार्टफोन स्पीकर मोडवर मोठ्या आवाजात लावून व्हिडीओ पाहणे सुरू करते. ती काय बघते याच्याशी आपल्याला काही देणेघेणे नसते. परंतु अत्यंत कर्कश आवाजात वाजणारे संगीत किंवा संवाद, मधून मधून 'आयोडमा...', आँय... असा विचित्र आवाज, हास्यांचे चित्कार, 'अभी मजा आयेगा ना भिडू', 'रुको जरा, सब्र करो..' असे काहीबाही संवाद लागोपाठ आपली इच्छा नसताना ऐकावे लागतात. ती व्यक्ती मग्न होऊन एकामागोमाग एक व्हिडीओ लावत असते. सार्वजनिक ठिकाणी स्पीकर मोडवर आपला मोबाईल ठेवू नये या सध्या पण महत्त्वाच्या सिव्हिक सेन्सशी त्याला काहीही देणेघेणे नसते. ही किरकिर सर्वांचेच डोके फिरवणारी असते. परंतु, 'उगीचच कशाला भानगडीत पडायचे? आपणही हेच करतो की.' असा विचार करून सगळे चुपचाप सहन करीत असतात. हे असह्य झाल्याने तुम्ही, हिंदीत किंवा मराठीत, आवाज कमी करण्याची विनंती त्या व्यक्तीस करता. 'कोण हा टिकोजीराव?' असा भाव चेहऱ्यावर आणून डोळे वटारून ती तुमच्याकडे पाहते. आपल्यामुळे दुसऱ्यांना त्रास होतोय याचा लवलेशही तिच्या चेहऱ्यावर नसतो. हे दृश्य थोड्याफार फरकाने देशात सर्वत्र दिसून येते. ती व्यक्ती स्मार्टफोनवर जे काही पाहते त्याला 'रील्स' म्हणतात. स्मार्टफोनमध्ये इंटरनेट आल्यावर विश्वातील ज्ञानाचे, मनोरंजनाचे भांडार मानवाच्या तळहातावर आले. फेसबूक, व्हॉट्सप, इन्स्टाग्राम इत्यादी सामाजिक माध्यमांच्या आगमनाने लोकांचा एकमेकांशी संपर्क वाढला, त्यांचे वर्तुळ व्यापक झाले. त्याचबरोबर या दशकाच्या प्रारंभी अस्तित्वात आलेले १५ ते ९० सेकंदांचे, कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त माहिती देणारे, मनोरंजन करणारे, एडिटिंगमधील कौशल्यास आणि सर्जनशीलतेस वाव देणारे हे रील्स प्रकरण थोड्याच अवधीत आबालवृद्धांमध्ये लोकप्रिय झाले. मानवाने केलेली ही अफाट प्रगती अभिमानास्पदच आहे. परंतु, त्यातील 'रील्स' प्रकरणाने जो हैदोस घातला आहे तो सामाजिक चिंतेचा विषय ठरत आहे. जोपर्यंत ज्ञान, मनोरंजन होत होते, कोणालाही त्रास होत नव्हता, तोपर्यंत या रीलसवर आक्षेप घेण्याचे काही कारण नव्हते. परंतु आज हे रील्स ज्ञान, मनोरंजनाच्या पलीकडे गेले आहेत. एवढेच नाही तर त्याचे काही गंभीर परिणाम दिसू लागले आहेत. रील्सकर्ते आणि रील्सदर्शक यांना रील्सचे व्यसन जडू लागले आहे, अशी आज परिस्थिती आहे. जेवण करताना, बागेत फिरताना, टीव्ही पाहताना, घरी कोणी आल्यास त्यांच्याशी बोलताना, टॉयलेटमध्ये, प्रवासात, या लोकांचे रील्सदर्शन चालू असते. आई-बाप आपल्या लहान मुलाला गुंतवून ठेवण्यासाठी किंवा गप्प बसवण्यासाठी मोबाईलवर रील्स लावून देतात. एखादा रील दोनचार सेकंदात आवडला नाही तर लगेच तो वर सरकवला जातो. रील्स पाहताना लोक व्यसनी माणसांसारखे तहान-भूक, काम-धाम विसरून जातात. म्हणून, हे असे का होत आहे, याकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. यावर पुढील मुद्दे विचारात घ्यावे लागतील. पटकन व्हायरल आणि झटपट प्रसिद्धी : प्रसिद्धीचा सोस अनेकांना असतो. आपले रील्स आगळेवेगळे असतील तर ते पटकन व्हायरल होऊन आपल्याला लगेच प्रसिद्धी मिळेल ही अपेक्षा रील्सकर्त्यांना असते. लाइक्स कमी मिळाल्यास कित्येक रील्सकर्ते अस्वस्थ, निराश होतात.डोपामाइन निर्मित, अजून काही मिळवायची ओढ : जेवढ्या अधिक लाइक्स, कॉमेंट्स, फॉलोअर्स तेवढा डोपामाइन या मेंदूतील प्रक्रियेद्वारा निर्मित आनंद अधिक आणि त्यातून अधिक रील्स निर्माण करण्यासाठी प्रेरणा मिळते. तसेच रील्सदर्शक रील्स पाहता पाहता त्यात गुंतून जातात आणि त्यांनाही असाच आनंद मिळतो. तो न मिळाल्यास अस्वस्थता येते. झटपट पैसा : रील्स पोस्ट केल्यावर 'मला फॉलो करा', 'रील्सना लाइक आणि शेअर करा', 'कॉमेंट करा' असा तगादा हे रील्सकर्ते त्यांच्या फॉलोअर्सच्या मागे लावतात. कारण, गेल्या काही काळापासून त्यांना लाइक्स, कॉमेंट्स किंवा फॉलोअर्सच्या संख्येच्या प्रमाणात पैसा मिळू लागला आहे. कमी कष्टात अधिकाधिक पैसा मिळवावा यासाठी रील्सकर्त्यांचा आटापिटा चालू असतो.पॉपकॉर्न ब्रेन सिंड्रोम : मानसशास्त्रज्ञ डेव्हिड लेव्ही आणि मायकेल डी मॉन्टमार्ट्रे यांनी ही संकल्पना मांडली आहे. ही मेंदूची एक अवस्था आहे. गरम तव्यावर पॉपकॉर्न तडतडतात त्याप्रमाणे सततच्या स्क्रीन वापरामुळे मेंदू स्थिर राहत नाही आणि त्याला काहीतरी नवीन, वेगवान आणि आकर्षक सतत हवं असतं. रील्सकर्ते आणि रील्सदर्शक सतत स्क्रीनसमोर असल्याने त्यांच्या मेंदूची अवस्था देखील अशीच होते. त्यातूनच ते पुन्हा पुन्हा रील्स बनवत राहतात/पाहत राहतात. तीव्र स्पर्धा आणि रील्सकर्त्यांची विपुलता : रील्सकर्ते लाखोंच्या संख्येने आहेत आणि त्यात वरचेवर भर पडत आहे. त्यामुळे रील्सचा धबधबाच कोसळतो आहे. त्यात आपण टिकून राहावे, आपल्या रील्सना अधिकाधिक लाइक्स, व्ह्यूज मिळावेत, अल्गोरिदममध्ये आपण दुर्लक्षिले जाऊ नये याचे दडपण येत असल्याने अगदी विक्षिप्त, अविश्वसनीय, अतिशयोक्त, खोट्या रील्स बनवल्या जातात. रील्स बनवताना विवेकाचे भान न ठेवल्याने कित्येकांना मृत्यू येतो. गाडी चालवताना स्टंटबाजी करणे, अतिवेगाने गाडी चालवणे, डोंगराच्या अगदी कड्याच्या टोकावर जाणे, धावत्या ट्रेनसमोर उभे राहून रील बनवणे अशा अनेक कारणांमुळे कित्येकांना आपला जीव गमवावा लागला आहे. कुणाला जीवघेणी मारहाण करताना, कोणाचा छळ करताना चित्रण करून त्याचे रील्स बनवण्याची आणि ते व्हायरल करण्याची विकृती वाढत आहे. त्यातही मार खाणारे बळी पडत आहेतच. शिवाय समाज असंवेदनशील बनू लागला आहे.सध्या फोफावलेल्या धार्मिक, जातीय, विद्वेषाच्या आगीत रील्स तेल ओतत आहेत. विशिष्ट धर्म, जातींच्या विरोधात खोट्यानाट्या आधारावर विखार, द्वेष व्यक्त करणाऱ्या, अफवा पसरवणाऱ्या रील्स केवळ काही मिनिटांत व्हायरल होतात. देवांबद्दल, महापुरुषांबद्दल निंदनीय रील्स व्हायरल होतात तेव्हा संबंधित समाज घटकांमध्ये तणाव निर्माण होऊन कायदा आणि सुव्यवस्था राबवणाऱ्या यंत्रणेवर ताण पडतो. अंधश्रद्धा पसरवणाऱ्या रील्स देखील अधूनमधून डोके काढत असतात. अशा रील्सना मिळणारा उदंड प्रतिसाद (व्ह्यूज, लाइक्स, फॉलोअर्स) खूपच धक्कादायक आहे. एकेकाळी ज्ञान आणि मनोरंजनाचे उत्तम साधन ठरलेल्या रील्सच्या जागी आलेल्या हल्लीच्या रील्स या समाजाला लागलेली कीड ठरत आहेत. सामाजिक आणि वैयक्तिक स्तरावर याचे अत्यंत गंभीर परिणाम संभवतात. ते रोखण्यासाठी सरकारी उपायांसोबतच सामाजिक प्रबोधनाची नितांत गरज आहे. निदान तातडीचा उपाय म्हणून सार्वजनिक ठिकाणी स्पीकर मोडवर मोबाईल ऐकणे हा दंडनीय अपराध ठरवून त्याची अंमलबजावणी त्वरेने केली पाहिजे.

# आझाद मैदानावर मंगळवारी इनाम जमीन हक्क परिषदेचे धरणे आंदोलन

बीड दि १४ (प्रतिनिधी):- दशनाम गोसावी, गुरव, पुजारी इतर समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषद व दशनाम गोसावी समाज परिषद बीड, अखिल भारतीय गुरव समाज संघटना व इतर अनेक समाज संघटना च्या वतीने १७ मार्च रोजी आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहिती मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषद चे ओमप्रकाश गिरी व अॅड.राजेंद्र बन, अॅड.जगदेव गिरी परभणी, दशनाम गोसावी समाज परिषदेचे जिल्हाध्यक्ष महंत दत्तात्रय महाराज गिरी, मराठवाडा महासंघाचे अध्यक्ष संपत्ती भाऊ पुरी, डॉ.मकरंद गिरी लातूर, प्रमोद बन लातूर, राज्याध्यक्ष पंडित गोसावी पुणे, धन्यकुमार पुरी तुळजापूर, गुरव समाजाचे राष्ट्रीय नेते अण्णासाहेब शिंदे, परशुराम सेवा संघाचे सुनील कुलकर्णी, नाथपंथी समाज रंगनाथ पैठणकर बीड, यांनी दिली आहे.



संघटनेच्या निवेदनानुसार, महसूल व सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंदर्भातील अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित असून त्या तातडीने मान्य करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली .यात राज्यातील देवस्थान इनामे वगळता इतर इनामे विविध इनाम निर्मूलन कायद्यांतर्गत रद्द करण्यात आली आहेत. त्याच धर्तीवर वंशपरंपरागत वहिवाट करणार्या गोसावी, ब्राह्मण,गुरव (पुजारी) समाजाकडे असलेल्या ईनाम वर्ग- ३ जमिनी निखलास पद्धतीने खालसा करून संबंधित सनदधारकांना द्याव्यात, अशी प्रमुख मागणी आहे. याशिवाय निवेदनामध्ये इतर महत्त्वाच्या मागण्याचा देखील समावेश आहेगोसावी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी हे आंदोलन असून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. समाजबांधवांनी मोठ्या संख्येने आझाद मैदान येथे उपस्थित राहून आंदोलन यशस्वी करावे. असे आवाहन प्रसिद्धी पत्रकातून करण्यात आले. दरम्यान, या आंदोलनाकडे राज्य सरकारचे लक्ष वेधले गेले असून पुढील भूमिका काय असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मराठा सेवा संघ माजलगाव आयोजित इफ्तार पार्टीत हिंदू-मुस्लिम बंधुभावाचा मोठा संगम

माजलगाव दि १४ (प्रतिनिधी):- मराठा सेवा संघ माजलगाव आयोजित स्नेहमिलन व इफ्तार पार्टी गुरुवारी सायंकाळी सहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, माजलगाव येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वी रित्या संपन्न झाली. रमजानच्या पवित्र महिन्यात आयोजित या कार्यक्रमाला राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह मुस्लिम बांधवांनी उदंड प्रतिसाद दिला.शिवरायांच्या छायेखाली हिंदू-मुस्लिम बंधुभावाची परंपरा आजही जीवंत आहे याचा प्रत्यय या कार्यक्रमाने दिला. समाजात बंधुभाव निर्माण व्हावा, सर्व धर्मांतील नागरिकांनी एकोप्याने जगावे यासाठी असे कार्यक्रम वारंवार घेणे आवश्यक आहे, अशा भावना उपस्थितांनी यावेळी उत्स्फूर्तपणे व्यक्त केल्या.माजी बांधकाम सभापती जयसिंह सोळंके, महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते प्रदीप दादा सोळंके, माजीद सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणातून हिंदू-मुस्लिम एकतेचे महत्त्व विशद केले व समाजात सौहार्दाचे वातावरण टिकवण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष नासेर पठाण, भारतीय जनता पार्टीचे नेते अरुण राऊत, गटनेते राहुल लंगडे, गटनेते इमरान आगाखान, नगरसेवक भागवतराव भोसले, अॅड .नारायण गोले पाटील, नगरसेवक इद्रिस पाशा, नगरसेवक जुनेद खान, नगरसेवक मतीन शेख, नगरसेवक डॉ. सचिन देशमुख, नगरसेवक अभिजीत पोटभरे, युवा नेते राहुल जगताप, रामभाऊ जगताप, धनंजय पापा सोळंके, रोहन घाडगे, अर्जुन नाईकनवरे, प्रा. श्रीकिशन देशमुख, मुख्याध्यापक मनोज कुमार सोळंके यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष दिलीप धुमाळ यांनी केले. सूत्रसंचालन नारायण झोडगे यांनी केले तर आभार विलास शेजुळ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पुरुषोत्तम जाधव,अर्जुन वाघ,विनोद गायकवाड,रामदास कापसे, बालासाहेब झोडगे ,विकास गायकवाड, विनोद ठोंबरे,पदमाकर शिंदे,उत्तम पवार,गणेश ढीसले, सोमेश्वर मोरे, प्रताप धपाटे ,भगवान गायकवाड, सचिन डुडुळे,विलास कोळपे, परमेश्वर आडागळे,दिगंबर मांडवगणे, कृष्णा तौर, गोपाल जाधव, दादासाहेब कचरे, अॅड.अनंत बादाडे, गणेश घाटूळ यांच्यासह मराठा सेवा संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.



# दिपक शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन ; शिबिरात एकूण १२६ रक्तदात्यांनी केले रक्तदान



अंबाजोगाई दि १४ (प्रतिनिधी) :-- अंबाजोगाई शहरातील रक्तदाते म्हणून ओळख असलेल्या दिपक शिंदे मित्रमंडळाच्या वतीने सामाजिक उपक्रमांची परंपरा जपत दिपक भैय्या शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण १२६ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. डॉ अक्षय कदम डॉ. आकांक्षा उमरेडकर, शशिकांत पारखे, आनंद सिताप डॉ. परवीन शेख, बाबा शेख, अमोल चव्हाण, महादेव शिरसाठ, माधव गोचडे या सर्वांनी सहकार्य केले. त्याबद्दल दिपक भैय्या शिंदे मित्रमंडळाच्या वतीने आभार मानले. तसेच दिपक शिंदे मित्र मंडळाच्या वतीने जि.प. प्राथमिक शाळा श्रीपतरायवाडी येथील शाळेत विद्यार्थ्यांना शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक देशमुख सर, मुख्याध्यापक संगवे सर, ग्रामपंचायत सरपंच गोवर्धन मनोहर पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पांडुरंग अस्वले यांची प्रमुख उपस्थिती होती.

# दौलावडगाव येथील चर्मकार बांधवांचे घर व संत रविदास अध्ययन केंद्र समाज कंटकांनी जाळले

बीड दि १४ (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील दौलावडगांव येथील चर्मकार समाजातील असलेल्या गाडे कुटुंबाला गेल्या अनेक दिवसांपासून गावगुंडांकडून त्रास होता.त्यांना गावातून हुसकावून लावण्यासाठीचा प्रकार ते वारंवार करीत होते. दि २४ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री श्री गोपीनाथ गाडे यांचे घर, दुकान व संत रविदास महाराज अध्ययन केंद्र जाळून राख रांगोळी केली. घटनेला पंधरा दिवस झाले तरी अद्यापही गावगुंडांना अटक नाही आरोपी मोकाट फिरत आहेत. १५ मार्च पर्यंत आरोपींना अटक न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा चर्मकार ऐक्य परीक्षेच्या वतीने जिल्हाधिकारी तसेच एस पी यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.सुदैवाने या घटनेवेळी गाडे कुटुंब बाहेरगावी असल्याने ते या दुर्घटनेतून बचावले आहे या घटनेने गाडे कुटुब भयभीत झाले असून जवळपास ५० लाखाचे नुकसान झाले आहे. या प्रकरणाची तात्काळ तक्रार अंबोरा पोलिस स्टेशनमध्ये देण्यात आली होती. या घटनेला १५ दिवस झाले तरी अद्यापही गावगुंडांना अटक नाही कारवाई नाही. आरोपी मोकाट फिरत असून त्यांना पोलिसांचे अभय मिळत आहे काय असा प्रश्न पडला असून गाडे कुटुंब भयभीत झाले आहेत. संत रविदास अध्ययन केंद्र व गोपीनाथ गाडे यांचे घर आणि दुकान जाळणाऱ्या आरोपींना अटक करून कडक शिक्षा व्हावी व गाडे कुटुंबाचे पुर्नवसन करण्यात यावे.या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ कारवाई करावी नसता चर्मकार ऐक्य परीषदेच्या वतीने राज्यस्तरीय बेमुदत धरणे आंदोलन सोमवार दि. १६ मार्च पासून जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे करण्यात येणार येईल असा इशारा परीषदेच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी मा.खामकर संजय अध्यक्ष,विलास बामणे,हाणवते गणेश, गायकवाड संजय,गाडे वतीने संतोष, डोईफोडे महादेव,शिवाजी तावरे, गायकवाड सुभाष इ. समाज बांधव उपस्थित होते.

# रायसीना इंग्लिश स्कूल या शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

गेवराई दि.१४ (प्रतिनिधी) :- प्रत्येक पालकाने आपल्या पाल्यांकडे वेळीच लक्ष देवून आपल्या मुलांना बालवयातच चांगले संस्कार द्यावेत तसेच मुलांनी एआय तंत्रज्ञानाचा चांगल्या गोष्टी व अभ्यासासाठी योग्य वापर करुन ध्येय प्राप्तीसाठी वेळ द्यावा असे मत गेवराई पोलीस ठाण्याचे सपोनि संतोष जंजाळ यांनी व्यक्त केले. केसुला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित रायसीना इंग्लिश स्कूल सुशी या शाळेच्या दहाव्या वार्षिक स्नेहसंमेलनात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शारदा हॉस्पिटलचे डॉ.प्रदीप राठोड तर प्रमुख पाहुणे म्हणून सपोनि संतोष जवंजाळ, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ गर्जे, प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक हिमांशू नागरे, पत्रकार सखाराम शिंदे, निखिल वाघमारे, गणेश घायतिडक, नितीन बारगजे, पत्रकार विनोद नरसाळे, पत्रकार विनोद पौळ, ग्रा.पं.सदस्य वशिष्ट काळे, गोपाल शर्मा, साईनाथ गावडे, शर्मा मॅडम, राजेंद्र सांगळे, सरपंच तुकाराम तळतकर, सुनील औटे, सतीश पवार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.विजय राठोड यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या मागील दहा वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. स्वराज्यरक्षक, महापराक्रमी, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर चित्तथरारक देखावा सादर करुन चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. तसेच यावेळी मोबाईल बुरी बला यासह हिंदी, मराठी गीतासह धार्मिक गाण्यावर नृत्य सादर करुन रंगीबेरंगी वेशभूषा, तालबद्ध हालचाली आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणा मुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली होती. विशेषतः लहानग्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली नृत्ये, देशभक्तीपर गीते, नाटिका व समूह नृत्य यांना प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यांमध्ये पारंपरिक, देशभक्तीपर तसेच आधुनिक शैलींचा सुंदर संगम पाहायला मिळाला. त्यांच्या निरागस सादरीकरणामुळे उपस्थित पालक आणि ग्रामस्थ भारावून गेले होते. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व आयोजन शाळेचे संचालक विजय राठोड यांनी केले. आकर्षक डेकोरेशन, प्रभावी बॅकग्राऊंड व्यवस्था आणि शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मयुरध्वज औटे, आकाश सर आणि शिवकन्या भोसले यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आशा मिस, अनिल सर, नीता मिस, वैशाली मिस, रेणुका मिस, शुभांगी मिस, सोनाली मिस, स्वप्निल माने आणि रोशन सर यांनी विशेष परिश्रम घेतले.




# शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहचविण्यास प्रशासन कटिबद्ध उपविभागीय अधिकारी वजाळे



घाटनांदूर दि.१४(प्रतिनिधी)-अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर मंडळातील गावांसाठी आई मंगल कार्यालय घाटनांदुर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली व उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे व तहसीलदार विलास तरंगे यांच्या विशेष प्रयत्नांनी १४ मार्च रोजी आयोजित केले होते. यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी वजाळे यांनी शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी प्रोसेस कटिबद्ध असल्याचे नमूद केले. या शिबिराला प्रमुख पाहुणे म्हणून परळी मतदारसंघाचे आ. धनंजय मुंडे, अप्पर जिल्हा अधिकारी अंबाजोगाई अश्विनी सोनवणे-जिरंगे, उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे ,तहसीलदार विलास तरंगे, यांची विशेष उपस्थिती लाभली होती.कार्यालयातील संजय गांधी विभाग, पुरवठा विभाग, सेतू कार्यालय व महसूल विभाग उपस्थित होता. तसेच घाटनांदूर मंडळातील सर्व गावांचे ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी घाटनांदूर यांच्या सहभागाने मेळाव्यास उपस्थित होते. यावेळी महसूल विभागाच्या श्रीमती घुगे मॅडम यांनी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधून योजनांची माहिती दिली.शिबिरात विविध प्रकारची कांबळे तक्रारदाराची मान्य ऐकून घेऊन करण्यात आली. घाटनांदूर मंडळातील ग्रामस्थानी शिबिरास उत्स्फूर्तपणे उपस्थित राहून भरघोस प्रतिसाद दिला. गावातील मान्यवरांनी सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सर्व विभागांचे व उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानले.यावेळी तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# मंगलाताई सोळंके कै.अॅड.सुधाकरराव देशमुख स्मृती पुरस्काराने होणार सन्मानित

माजलगाव दि.१४ (प्रतिनिधी)येथील ज्येष्ठ विधिज्ञ कै.अॅड. सुधाकरराव देशमुख स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने कै.अॅड.देशमुख यांच्या २९व्या स्मृतिदिना निमित्ताने देण्यात येणारा कै.ड.सुधाकरराव देशमुख स्मृती पुरस्कार माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ.मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांना 'स्मृतिगंध'या कार्यक्रमात प्रदान केला जाणार आहे.कै.सुधाकरराव देशमुख स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने मागील २९ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम तसेच आरोग्य शिबिराचेही आयोजन केले जाते.तसेच माजलगावसह बीडच्या भूमीत घडलेल्या आणि आपल्या कर्तृत्ववाने नावलौकिक मिळवलेल्या



कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरवही स्मृती पुरस्कार प्रदान करून केला जातो. यंदा या पुरस्कारासाठी आपल्या कार्यशैलीतून माजलगाव सारख्या ग्रामीण भागात शैक्षणिक, सामाजिक, सहकार आणि महिला सबलीकरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांना 'स्मृतिगंध'या विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.बुधवार दि. २५ मार्च रोजी सायंकाळी ५:३० वाजता अनंत भालेराव सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने ड.सुलभाताई देशमुख, नगरसेवक डॉ.सचिन देशमुख, डॉ.रोहिणी देशमुख यांच्यासह सर्व सदस्यांनी केले आहे.

# गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स येथे वार्षिक उमंग फेस्टचे आयोजन



माजलगाव (प्रतिनिधी):- तालुक्यातील नामांकित शैक्षणिक संकुल गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स येथे काल दिमाखात 'उमंग' या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या उत्सवात डी फार्मसी, बी फार्मसी, बीएएमएस, फिजिओथेरपी, नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. तीन दिवस चालणाऱ्या या उमंग फेस्ट मध्ये ट्रॅडिशनल डे, बॉलिवूड डे सेलिब्रेशन, डान्स, ड्रामा अशा विविध क्टिव्हिटी होणार आहेत तसेच या कार्यक्रमाची सांगता सिने अभिनेते संदीप पाठक यांच्या उपस्थितीत आणि एकपात्री नाटक 'व्हराड निघाले लंडनला' याच्या सादरीकरणाने होणार आहे.

उमंग फेस्टचे उद्घाटन मान्यवरांनी प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलाने करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नामांकित पत्रकार रत्नाकर कुलथे यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. प्रकाश राजेभोसले यांनी भूषविले त्यांच्या सोबत मंचावर सौ. नंदिनी राजेभोसले, गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या सचिव डॉ. प्रियंका राजेभोसले, आयुर्वेद महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. प्रज्वल म्हस्के, फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. मकेश बाबू, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमित बिंदू आदी मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अमित बिंदू यांनी केले तसेच डॉ. मकेश बाबू यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. प्रकाश राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना मागदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. इशिका यांनी केले त्यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी घेतली.

# किट्टी आडगावात महसूल शिबिर उत्साहात संपन्न

## सर्कलमधील जनतेची अनेक कामे लागली मार्गी



माजलगाव दि.१४ (प्रतिनिधी)- तालुक्यातील किट्टी आडगाव येथे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' उत्साहात पार पडले. या शिबिरात किट्टी आडगाव सर्कलमधील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध शासकीय कामे करून घेतली. त्यामुळे अनेक प्रलंबित कामांना मार्ग मिळाला.

शिबिरास आ.प्रकाश सोळंके, तहसीलदार संतोष रुईकर, तालुका कृषी अधिकारी गणेश बादाडे, गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक, नायब तहसीलदार श्री. धस, नायब तहसीलदार श्री. सय्यद, मंडळ अधिकारी संतोष हंगे, ग्रामविकास अधिकारी महेश गेंदले, सरपंच रुख्मानंद खेत्रे यांची उपस्थिती होती.शिबिरामध्ये सातबारा उतारे, फेरफार नोंदी, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, वारस नोंद तसेच इतर महसूल विषयक अर्ज स्वीकारून त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात आली. अनेक नागरिकांची कामे जागेवरच निकाली काढण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळ अधिकारी संतोष हंगे, सरपंच रुख्मानंद खेत्रे यांचेसह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत शिबिराचा लाभ घेतला.

## महिला दिन फक्त उत्सव म्हणून साजरा करू नका समान संधीसाठी प्रयत्न करा – प्रा. सुशीलाताई मोराळे

बीड (प्रतिनिधी): संपूर्ण जगाच्या उभारणीत अनेक महिलांनी आपले कर्तृत्व पनाला लावले आहे. हा दिवस साजरा करण्यासाठी १९१० मध्ये कोपनहेग येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेमध्ये क्लारा झेटकिन यांनी सर्वात प्रथम पाऊल उचलले. १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून साजरा करण्याचे आवाहन जगातील राष्ट्रांना केले. संपूर्ण जगात स्त्रियांचा सन्मान व अधिकार त्यांना मिळावा म्हणून या दिवसाचे महत्त्व आहे हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमाने साजरा केला जातो. या दिवसाचा उत्सव करू नका अधिकारासाठी लढा असे प्रतिपादन ज्येष्ठ महिला नेत्या सुशिलाताई मोराळे यांनी ऊसतोड कामगार महिलांच्या मेळाव्यात केले या कार्यक्रमाचे आयोजन बबनराव माने यांनी केले होते.

महिलांनी जीवनात क्रांतिकारी बदल घडवावेत क्रीडा क्षेत्रात नैपुण्य मिळवावे अधिकारी पदाधिकारी व्हावे उद्योग क्षेत्रात भरारी घ्यावी राजकारणात मोक्याच्या पदावर जावे या पदावर जाताना कुणाच्या कुबड्या घेऊ नयेत. हा दिवस फक्त उत्सवाचा महोत्सवाचा नसून समाजात समान संधी, स्त्रियांचा पावलोपावली होत असलेला अपमान संपण्यासाठी प्रयत्न करावेत. स्त्रियांनी सक्षम व्हावे सक्षमीकरण म्हणजे निर्णय प्रक्रियेत तिचा सहभाग, मीटिंग चे विषय स्त्रियांनीच ठरवावेत. असे प्रतिपादन प्रा. सुशिलाताई मोराळे यांनी केले आहे. याप्रसंगी मोठ्या प्रमाणावर ऊसतोड महिलांची उपस्थिती होती.

# 'मार्च एन्ड' मुळे राष्ट्रीयकृत बँकांसह विविध संस्थांचा कर्ज वसुलीचा धडाका

पिंपळनेर दि.१४ (प्रतिनिधी) – शासकीय, निमशासकीय, खासगी संस्थांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा महिना असलेला 'मार्च एन्ड' मुळे वसुलीच्या तगाद्याने बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरातील सर्वसामान्य अनेकांनी चांगलाच धसका घेतला असल्याचे दिसून येत आहेत.

राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी बँका, खासगी पतसंस्था, मल्टीस्टेट, खासगी मायक्रो फायनान्स, खत दुकानदार, कापडव्यावसायिक, किराणा दुकानदार आदी सर्वांनीच सध्या मार्च एन्डच्या नावाखाली वसुलीचा सपाटा लावला असल्याचे चित्र निदर्शनास येत आहे. साधारणतः पाच–सहा जणांचे एखादे टोळके एखाद्या गावात अथवा गल्लीत, भागात फिरताना आढळून आले की वसुलदार आले ही धारणा तेथे निर्माण होऊन खिशात दमडीही नसणारे त्यांचा सुगावा लागताच गावातून व आपल्या भागातून, गल्लीतून धूम ठोकताना दिसत आहेत. कर्जदार हे जामीनदारांनाही याची कल्पना देऊन गावात फिरू नका, ते गावात फिरत आहेत, अशी सूचना करून भूमिगत होण्यास सांगत आहेत. सर्वच संस्थांना आपला वार्षिक ताळमेळ जुळवणे गरजेचे असते. त्यानुसार मार्च महिना हा वर्षाचा हिशोबाचा लेखा–जोखा मांडुन अहवाल तयार करून तो सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे विविध बँका, संस्था आपले कामकाज उरकण्याच्या प्रयत्नात असतात. शासनाने लागू केलेल्या एक लाख रूपयांपर्यंतच्या बिनव्याजी कर्ज योजनेचा फायदा सचिवांसह काही पैसेवाल्यांना चांगलाच होताना दिसत आहे. बिगर व्याजी उचललेल्या कर्जाचे नवं–जूनं करताना शेतकऱ्यांच्या चांगलेच नाकी नऊ येताना दिसत आहे. शेतीमालाचे उत्पादन चांगले झाले असले तरी दर नसल्यामुळे भयावह चित्र दिसत आहे. त्यामुळे वर्षांचे नवजुने करताना शेतकऱ्यांना मोठी कसरत करणे भाग पडत आहे. त्यामुळे सचिव लोकांचा खिसा चांगलाच गरम होताना दिसत आहे. एका दिवसासाठी शेतकऱ्यांकडून मोठी रक्कम वसुली केली जात असल्याचे समजते.

कर्जदार बँक ग्राहकाच्या खात्यामधून परस्पर रक्कम काढून त्यांची मुस्कटदाबी करत आहेत. कर्जदाराच्या परवानगीशिवाय परस्पर पैसे घेत आहेत. बँक असो अथवा कोणतीही संस्था असो ती टिकण्यासाठी चालण्यासाठी कर्ज वसुली हा महत्त्वाचा टप्पा असतो. मात्र वसुलीची पद्धत अति उग्र व अघोरी असल्याचे सर्वसामान्य मधून बोलले जात आहे. कर्जदारांनीही आपण घेतलेले कर्ज भरण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडली पाहिजे. पैसे कापुन घेण्याचा अधिकार बँकांना नसुनही असे केले जात असल्याबाबत चर्चा होत आहे. डिकरी झाल्याशिवाय (अधिकृत मान्यता) कर्जदाराच्या इतर खात्याला बँकेला हात लावता येत नाही, हे वास्तव असून तसे झाल्यास शेतकरी, बैंक ग्राहकांनी ही बाब लक्षात घेऊन रिझर्व्ह बँकेला, उपनिबंधकांना, पोलीस ठाण्यात तक्रार देता येते ही कायद्यात तरतूद आहे.

## डिपेक्स २०२६ मध्ये परळीच्या शासकीय आयटीआय मिळाला द्वितीय पुरस्कार

परळी दि १४ (प्रतिनिधी) छत्रपती संभाजीनगर येथील एमआयटी कॅम्पस येथे पाच ते आठ मार्च दरम्यान डीपेक्स २०२६ हे तंत्र प्रदर्शन संपूर्ण झाले. यामध्ये लोकनेते गोपीनाथ मुंडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था परळी वैजनाथ च्या वीजतंत्री व्यवसाया च्या ट्रान्समिशन लाइन प्रोटेक्शन या प्रकल्पास इलेक्ट्रिकल सेक्शन मध्ये द्वितीय पारितोषक मिळाले.

सदरील प्रकल्प सृष्टी काळे, निशा मुंडे, ज्ञानेश्वरी मुंडे, भारती कसबे, मनीषा गित्ते या प्रशिक्षणार्थ्यांनी किशोर पवार व जाधव निखिल शिल्प निदेशक वीजतंत्री व श्रीमती केंद्रे मॅडम यांच्या मार्गदर्शनखाली पूर्ण केला. मुंबई येथे झालेल्या डिपेक्स २०२४ मध्ये ही आय टी आय परळी ने तृतीय पारितोषिक मिळविले होते. या सातत्य पूर्ण यशाबद्दल जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी डॉ.पी.डी उखळीकर व संस्थेचे प्राचार्य संतोष लोखंडे, संस्था व्यवस्थापन समिती चेअरमन हरिदास आलुरे, गट निदेशक एम. जी. पुजारी सर व नवसुपे सर यांनी विजेत्या प्रशिक्षणार्थ्यांचे कौतुक केले. या यशा बद्दल विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा जल्लोष

## आदित्य शिक्षण संस्थेच्या स्नेहसंमेलनाची उत्साहात सुरुवात

बीड दि.१४ (प्रतिनिधी) - विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा देखणा आविष्कार आणि उत्स्फूर्त सहभागाच्या वातावरणात येथील आदित्य शिक्षण संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची उत्साहात सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पारंपरिक नृत्य, देशभक्तीपर गीत, नाटिका, समूह सादरीकरणांनी स्नेहसंमेलनाच्या पहिल्या दिवसाला विशेष रंगत आणली. उपस्थित प्रेक्षकांची दाद मिळाली.

आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडत आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला बीड शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा होते. यावेळी सीए गिरीश गिल्डा, आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा तसेच संचालिका डॉ. आदिती सारडा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबतच सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्नेहसंमेलनांचे मोठे महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.

या स्नेहसंमेलनात आदित्य शिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या विविध कोर्सेस मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळे कलाप्रकार सादर केले. उपस्थितांची दाद मिळाली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार ठरला. विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. विवेक कुलकर्णी यांनी केली. सूत्रसंचालन संग्राम तनपुरे व प्रतीक्षा सुसर यांनी केले. आभार डॉ. अमोल सानप यांनी मानले.

# पत्रकार संघ आणि लाईफस्टाईल जीमच्या वतीने रोजा इफ्तार पार्टी उत्साहात संपन्न

### संवेदनाशील जिल्ह्यामध्ये अशा सामाजिक उपक्रमांची नितांत गरज – उपस्थितांची मते



बीड (प्रतिनिधी) पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर पत्रकार संघ आणि लाईफस्टाईल जीमच्या वतीने शुक्रवार, दिनांक १३ मार्च २०२६ रोजी लाईफस्टाईल जीम, नवी भाजी मंडई येथे रोजा इफ्तार पार्टी मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाली. या कार्यक्रमात पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते.

दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी आणि लाईफस्टाईल जीमचे संस्थापक बॉडी बिल्डिंगचे नॅशनल जज, इंटरनॅशनल कोच डॉ.सय्यद अरशियानउल्लाह मिसबाहउल्लाह सर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १३ मार्च २०२६ रोजी रोजा इफ्तार पार्टी मोठ्या उत्साही आणि आनंदी वातावरणामध्ये संपन्न झाली. या आयोजित इफ्तारच्या निमित्ताने सर्व धर्मीय नागरिक एकत्र येत बंधुभाव, सामाजिक ऐक्य आणि परस्पर सलोखा याचा सुंदर संदेश देण्यात आला. रमजान हा संयम, त्याग, सेवा आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र महिना असून समाजात शांतता, सद्भावना आणि एकात्मता टिकवून ठेवण्याचे महत्त्व उपस्थित मान्यवरांनी यावेळी अधोरेखित केले. बीड सारख्या संवेदनशील जिल्ह्यामध्ये अशा उपक्रमाचे आयोजन करून खऱ्या अर्थाने सामाजिक सलोखा जपण्याचे काम आयोजकांनी केले अशा भावना या कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी व्यक्त करत या उपक्रमाचे कौतुक केले. अशा कार्यक्रमांमुळे समाजात एकोपा वाढण्यास मदत होते, असे मत आलेल्या सर्व मान्यवरांनी व्यक्त केले. इफ्तारच्या वेळी सर्व उपस्थितांनी एकत्र येत रोजा सोडला आणि एकमेकांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रामुख्याने ज्येष्ठ संपादक गंमत भंडारी, पत्रकार संघाचे मा. प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, मंत्रालयातील ओएसडी प्रा. हमराज ऊईके, जफर खान साहब, हाफिज जमील साहब, सय्यद जबीउल्हाह साहब, उमर खान, सय्यद कौशिक, इमरान जहागीरदार, स्वातंत्र्य सैनिक आणि रेल्वे आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा, ज्येष्ठ समाजसेवक गोविंद सेठ कासट, ज्येष्ठ संपादक गुलदाद पठाण, सेवानिवृत्त शाखा अभियंता शेख अकबर, ज्येष्ठ पत्रकार रईस खान, प्रा. जावेद पाशा सर, पत्रकार अदनान खान, जिव्हाळा बेघर केंद्राचे अभिजीत वैद्य, राजू वंजारे यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उस्फूर्तपणे सहभागी झाली होती.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि पदाधिकारी तसेच लाईफस्टाईल जिमचे संस्थापक बॉडी बिल्डिंगचे नॅशनल जज, इंटरनॅशनल कोच डॉ.सय्यद अरशियानउल्लाह मिसबाहउल्लाह सर, एक्झिक्यूटिव्ह फाउंडर डायरेक्टर महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन मुंबई तसेच इंजि. सय्यद अमानउल्लाह सचिव बॉडी बिल्डिंग असोसिएशन मुंबई यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम शांत, आनंददायी आणि उत्साही वातावरणात पार पडला. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

## दिव्यांग नागरिकांनी 'दिव्यांग सहाय्य' पोर्टलवर नोंदणी करावी – सभापती आरती बनसोडे

बीड (प्रतिनिधी) : शहरातील तसेच प्रभागातील दिव्यांग नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी शासनाने 'दिव्यांग सहाय्य' पोर्टलची निर्मिती केली आहे. दिव्यांग नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या पोर्टलवर नोंदणी करून विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालकल्याण समिती सभापती आरती रंजीत बनसोडे यांनी केले आहे.

या पोर्टलवर दिव्यांग क्षेत्रात कार्यरत संस्थांची नोंदणी व नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण करता येणार आहे. तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी राज्य दहावीपूर्व शिष्यवृत्ती योजना, विविध साधने व उपक्रमांसाठी अर्थसहाय्य, दिव्यांगांसाठी राज्य पुरस्कार योजना आदी योजना उपलब्ध आहेत. याशिवाय शासकीय संस्थांमधून व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण केलेल्या दिव्यांगांना व्यवसाय संच व इतर साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य, रोजगारासाठी सहाय्य, सामाजिक सुरक्षिततेअंतर्गत विवाह प्रोत्साहन अनुदान योजना, विशेष सहाय्य योजना, रमाई आवास घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना तसेच शहरी व ग्रामीण भागातील दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विविध योजना या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करून उपलब्ध होणार आहेत. तसेच आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती महिला व बालकल्याण समिती सभापती आरती रंजीत बनसोडे यांनी वर्तमानपत्राच्या माध्यमातून दिली आहे.

## नवविधा भक्ती आणि उपासनेतून शाश्वत समाधान मिळते–सौ.वर्तक

बीड दि १३ (प्रतिनिधी) - नवविधा भक्ती आणि उपासनेतून शाश्वत समाधान मिळत असते आणि त्यासाठी अभ्यासातून प्रगटणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन पूर्णवाद अभ्यासक सौ.प्रज्ञा वर्तक यांनी केले. येथील संत भगवान बाबा प्रतिष्ठान परिसरातील पिंगळे निवासस्थानी असलेल्या 'ॐ विष्णवे नमः' मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजीत तीन दिवसीय कार्यक्रमात पहिल्या दिवसाचे पूर्णवादावरील पुष्प गुंफताना त्यांनी उपासना मार्गाची माहिती दिली. डॉ. रामचंद्र पारनेरकर महाराज यांनी अनेक तत्त्वांचा अभ्यास केला. मृत्यू हा शाश्वत आहे, त्यामुळे जीवन जगण्यासोबतच ऐच्छिक जीवन लाभ आणि मरण भय मुक्ती हा महत्त्वाचा सिद्धांत त्यांनी मांडला. नवविधा भक्तीतून शाश्वत समाधान मिळते असे ते म्हणतात. परमार्थ हा उत्तम प्रपंच केला तर त्यासोबतच राहतो, त्यासाठी वेगळे काही प्रयत्न करावे लागत नाहीत. एकवीस अभंग आणि अठरा आर्यांच्या माध्यमातून डॉ. रामचंद्र पारनेरकर महाराज यांनी उपासना मार्ग सोपा करून सांगितला आहे. उपासना हे साधन सांसारिकासाठी आहे, त्यातून पूर्ण पुरुषाचे दर्शन होते. आपल्याला फक्त अभ्यास करून ते आचरणात आणायचे आहे. असे सांगून त्या म्हणाल्या की, त्यासाठी उपासना आवश्यक आहे. कार्यक्रमाचे आभार अशोक महाजन यांनी मानले. या कार्यक्रमास अशोककाका महाजन, सौ.आनंदी महाजन मुरलीधर देशपांडे, दिगंबरराव कुंडलकर, अरुण कुंडलकर, सौ. सुनंदा कुंडलकर, सौ. आशाताई हिंदोळे, सौ. कस्तुरीताई गायकवाड, सौ. प्रतिभा पाटील यांसह अनेक जण उपस्थित होते.

# ह.भ.प.राजू लोखंडे महाराज यांना लोकरत्न पुरस्कार

बीड दि.१३ (प्रतिनिधी) - लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन तर्फ समाजातील अध्यात्मिक, धार्मिक व तर्कशास्त्रीय क्षेत्रात आगळेवेगळे व समाजोपयोगी कार्य करणारे ह.भ.प.राजू लोखंडे महाराज यांना लोकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शेतकरी कुटुंबात जन्मलेले राजू महाराज लोखंडे यांचे प्राथमिक शिक्षण दिघोळ ता.जामखेड येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. वशालेय जीवनापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या महाराजांनी पुढे एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण केले. वपाटोदा येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांनी खेमानंद महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले. काही काळ वैराग्यमूर्ती ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत सेवा केल्यानंतर अध्यात्मिक साधनेला पूर्णतः वाहून घेतले आहे.

ब्रह्मचारी वृत्तीने जीवन जगत असताना त्यांनी तारखेच्या तर्कशास्त्रावर आधारित विलक्षण ज्ञान आत्मसात केले. कोणताही ज्योतिषशास्त्राचा औपचारिक अभ्यास न करता केवळ तर्कशक्तीच्या आधारे व्यक्तीची जन्मतारीख, वार तसेच जीवनातील संभाव्य घटना अचूकपणे सांगण्याची अद्भुत क्षमता त्यांनी प्राप्त केली आहे. त्यांच्या अनेक भाकितांचा अनुभव आजवर खरा ठरलेला असून राज्य व जिल्हा पातळीवरील अनेक राजकीय व सामाजिक अंदाज चर्चेचा विषय ठरले. नैराश्यात सापडलेल्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्यातील येणाऱ्या सकारात्मक क्षणांची जाणीव करून देत आत्महत्येसारख्या टोकाच्या विचारांपासून परावृत्त करण्याचे समाजकार्य महाराज सातत्याने करत आहेत. यापूर्वी त्यांना समाजरत्न पुरस्कार गंगाई-बाबाजी समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. या पुरस्कार निवडीबद्दल ह.भ.प. राजू महाराज यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## कर्मवीर अण्णासाहेब बेडसे यांच्या स्मरणार्थ कला उत्सव उत्साहात संपन्न

बीड दि १३ (प्रतिनिधी) - कलाउत्सव २०२५-२६ साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी धुळे संचलित यशवंत कला महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर कर्मवीर आप्पासाहेब बेडसे यांच्या स्मरणात कला उत्सव अतिशय उत्साहात पार पडला.

कला क्षेत्रातील सातत्यपूर्ण निष्ठावंत देणार नाही परिश्रमावर आदर्श विविध उपक्रम यशवंत कला महाविद्यालया सन २०२५ - २६या वर्षाचा कला शिक्षक पुरस्कार व सन्मानपत्र श्री अमित प्रतापराव गाढे यांना देण्यात आला. साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी साक्री श्री . दादासो पराग बेडसे यांचा हस्ते प्रधान करण्यात आला. त्यांच्यासोबत सचिव भैया अनिल सोनवणे प्राचार्य श्री रविंद्र तोरवणे हे उपस्थित होते .

# ठिबक–तुषार वितरकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्रित पोर्टलची मागणी

गेवराई दि.१३ (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य ड्रीप डीलर असोसिएशनच्या वतीने कोल्हापूर येथे आयोजित राज्यस्तरीय ठिबक व तुषार वितरकांची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने ठिबक व तुषार सिंचन वितरक या बैठकीस उपस्थित होते. बैठकीत वितरकांना भेडसावत असलेल्या अडचणी, अनुदान प्रक्रिया तसेच ऑनलाईन प्रणालीतील त्रुटींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीचे अध्यक्षस्थान असोसिएशनचे अध्यक्ष इंजिनिअर सुदामजी खोसरे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे नियोजन पश्चिम महाराष्ट्र व कोकण विभाग प्रमुख शैलेश लंबे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या बैठकीस कृषी विभाग व मायक्रो इरिगेशन क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यामध्ये डीबीटी विशेषज्ञ सागर खटकाळे (अधीक्षक कृषी अधिकारी), महाराष्ट्र मायक्रो इरिगेशन मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे अध्यक्ष झुंबरलाल भंडारी, मायक्रो इरिगेशन मॅन्युफॅक्चर असोसिएशन ऑफ इंडियाचे



अध्यक्ष कृष्णात महामुलकर तसेच जैन इरिगेशनचे प्रतिनिधी एस.एन.पाटील यांचा समावेश होता. या मान्यवरांनी ठिबक व तुषार सिंचन योजनांच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. बैठकीदरम्यान वितरकांनी शासनासमोर विविध मागण्या मांडल्या. त्यामध्ये ठिबक व तुषार वितरकांचे स्टॉक बुक ऑनलाईन उपलब्ध करणे, वितरक नोंदणी प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन करणे, शेतकऱ्यांचा ड्रॉ वेळेत काढणे, मंजूर अनुदान वेळेत वितरित करणे तसेच शेतकऱ्यांच्या अनुदानाचा डेटा ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध करून देणे या प्रमुख मागण्यांचा समावेश होता. तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा तात्काळ सुरू करावा, महाडीबीटी व अन्य पोर्टलवरील तांत्रिक अडचणी दूर कराव्यात आणि तुषार सिंचन अनुदानासाठी किमान क्षेत्र मर्यादा २० गुंठ्यांवरून १० गुंठे करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

सध्या शेतकऱ्यांच्या अनुदान प्रक्रियेसाठी महाडीबीटी पोर्टल, सिंचन प्रणाली डेटा आणि अनुदान वितरणासाठी स्वतंत्र ॲप अशा तीन वेगवेगळ्या प्रणाली वापरल्या जात असल्यामुळे प्रक्रियेत विलंब होत असल्याचे वितरकांनी सांगितले. त्यामुळे हि संपूर्ण प्रक्रिया एका एकत्रित पोर्टलवर आणण्याची मागणी बैठकीत करण्यात आली. तपासणी प्रक्रियेत सुधारणा करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. सध्या ठिबक व तुषार सिंचन तपासणीसाठी कृषी सहाय्यक आणि कृषी पर्यवेक्षक अशी दोन स्तरांवर व्यवस्था आहे. प्रत्यक्ष तपासणी कृषी पर्यवेक्षकांकडून होत असतानाही ऑनलाईन प्रक्रियेत कृषी सहाय्यकांकडून प्रस्ताव परत पाठवले जात असल्याची तक्रार वितरकांनी केली. त्यामुळे या कामासाठी फक्त कृषी पर्यवेक्षकांचीच अधिकृत नेमणूक करावी अशी मागणी करण्यात आली.

या बैठकीत महाराष्ट्र राज्य ड्रीप डीलर असोसिएशन अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. राज्यभरातील वितरकांना एकत्र आणण्यासाठी राज्यव्यापी मेळावे व अधिवेशन आयोजित करण्याचाही निर्णय घेण्यात आला. तसेच शेतकऱ्यांना आधुनिक सिंचन योजना, हवामान बदलाचे परिणाम, पाणी बचत तंत्रज्ञान आणि शेती उत्पादन वाढविण्याचे उपाय याबाबत मार्गदर्शन करण्याचा निर्णयही घेण्यात आला. बैठकीस प्रमोद बायस्कर, पांडूरंग शिंदे, गणेश पाटील, शिवाजी वायाळ, सोपान पाटील, विवेक भामरे, प्रमोद पडवळ, प्रशांत चौधरी, मारुती पवार, शरद गोरे, भाऊसाहेब लवटे, सखाराम वायभट यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील वितरक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युद्धामुळे ड्रायफ्रूट महागले, ऐन रमजान दिवसांत नवीन आवक बंदचा परिणाम

पिंपळनेर (प्रतिनिधी) : आखाती देशांतील युध्दाची झळ इंधनाबरोबरच अंजीर, खजूर आदी ड्रायफ्रूटला बसली आहे. युध्दामुळे होर्मुज सामुद्रधुनी बंद असल्यामुळे इराण व आफगाणिस्थानातून होणारी अंजीर आणि खजूरची आवक बंद आहे. त्यामुळे ऐन रमजानमध्ये अंजीर व खजूर आदीच्या किंमती वाढल्या आहेत. याचा फटका मुस्लिम समाजातील गोरगरिब जनतेला बसला आहे. दरम्यान, नागरिकांची तसेच व्यावसायधारकांची सिलिंडरसाठी वणवण सुरुच आहे.

युध्दजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठा कमी झाल्याने वापरातील सिलिंडरचा पुरवठाच जवळपास बंद झाला. त्यामुळे हॉटेल, खानावळी तसेच रेस्टॉरंटचालकांची सिलिंडरसाठी वणवण सुरु आहे. मिळेल तेथून सिलिंडर चढ्या भावाने खरेदी केले जात आहे. जोडीला इलेक्ट्रिक शेगडीचा वापर करुन व्यवसाय सुरु ठेवला आहे. टंचाई अधिक दिवस चालली तर खानावळी देखील बंद होण्याची शक्यता वाढली आहे. याचा फटका महाविद्यालयीन विद्यार्थी व नोकरदारांना बसणार आहे.

सध्या रमजान सुरु आहे. मुस्लिम समाजाचे उपवासाचे दिवस सुरु आहेत. उपवास सोडण्यासाठी खजूर, अंजीर आदी ड्रायफ्रूट आवश्यक असल्याने मागणी वाढली आहे. परंतु युध्दजन्य परिस्थितीमुळे अंजीर, खजूर आदींची नवीन आवक नसल्याने उपलब्ध ड्रायफ्रटला मागणी वाढली आहे. त्यामुळे साहजिकच दर वाढले आहेत. एक हजार रुपये किमतीचे अंजीर आता अकराशे रुपयांना मिळत आहेत. तेराशे रुपये किलो अंजीर आता चौदाशे ते साडेचौदाशे दराने विकले जात असल्याचे पिंपळनेर येथील ड्रायफ्रुटचे डिलर यांनी सांगितले. खजूर किमंतीत देखील पेटीमागे ५० ते शंभर रुपये दर वाढल्याचे व्यापारी सांगत आहेत.


दै.पार्श्वभूमी,बीड Date-15/03/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - RAFAT SULTANA SHAIKH MOHAMMED SADEQUE**

**New Name : SHAIKH RAFAT SULTANA SHAFIKODDIN**

Address - Near Nurani Masjid Phule Nagar, Ta Majalgaon Dist.Beed Maharashtra - 431131

# पार्श्वभूमी

दि.१५ मार्च २०२६ रविवार




### नवगण महाविद्यालयात ‘गीत बहार’ कार्यक्रम उत्साहात

परळी वैजनाथ : येथील नवगण महाविद्यालयात संगीत विभाग व सांस्कृतिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ‘गीत बहार’ या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कलाकार प्रा. मनोज कुमार प्रकाश उपस्थित होते. या कार्यक्रमात जुन्या हिंदी चित्रपट गीतांचे सुरेल सादरीकरण करण्यात

पान २ वर

### जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओ थेरपी, माजलगावचा १०० टक्के निकाल

माजलगाव (प्रतिनिधी) : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यातर्फे नुकत्याच जाहीर झालेल्या बी.पी.टी. अंतिम वर्षाच्या परीक्षेत माजलगाव विकास प्रतिष्ठान संचलित जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लावला आहे. महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचने हे घवघवीत यश मिळवल्याने संस्थेसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण

पान २ वर

## आ.प्रकाशदादा, अधिकाऱ्यांचे एकदा कान टोचा
## सा बां.खात्याच्या दुर्लक्षित कारभारामुळे वडवणी कवडगाव रस्त्याची दुरावस्था



कवडगाव बु दि १४(प्रतिनिधी)- वडवणी तालुक्यातील कवडगाव ते वडवणी दरम्यानच्या ९कि.मी रोडची अत्यंत दुरावस्था झाली आहे या रोडवर मोठमोठे खड्डे पडले असून या रोडवर साधे पायी चालणे मुश्कील झाले आहे मात्र वडवणी सा.बां.खात्याला याचे काहीच सोयरसुतक नाही आ.प्रकाशदादा आपणच दखल घेऊन अधिकार्यांचे कान टोचा जेणेकरून त्यांना जाग येईल.
याबाबत अधिक माहिती अशी की वडवणी तालुक्यातील वडवणी ते कवडगाव या१४कि.मी मार्गावरील वडवणी ते साळिंबादरम्यानच्या ५कि.मी.रोडचे गेल्या ६महिन्यापुर्वी हाटमिक्स डांबरीकरण करण्यात आले आहे मात्र त्या रोडवर ही साळिंबा तलावाजवळ पुलाचे काम व्यवस्थितपणे न केल्याने नाल्याचे पाणी रोडवर जमा होत आहे तसेच या दरम्यान आत्ताच केलेल्या डांबरीकरणावर खड्डे पडले आहेत तसेच साळिंबा ते पिंपरखेड धाईफाटा मोरेवाडी व कवडगाव या ९कि.मी. मार्गावर इतके खड्डे पडले आहेत कि वाहने तर सोडाच परंतु या रोडवर साधे पायी चालणे मुश्कील झाले आहे कवडगाव व परिसरातील जवळपास १५ते२० गावांना वडवणी या तालुक्याच्या

पान २ वर

### नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत चोरटा रंगेहाथ पकडला;
#### पोलिस–गावकऱ्यांमध्ये शाब्दिक वाद

बीड (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत ग्रामस्थांनी चोरट्याला रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोलिसांना बोलावण्यात आले मात्र त्यांच्याकडून काहीच प्रतिसाद मिळत असल्याने पोलिस-गावकऱ्यांमध्ये शाब्दिक वाद झाला. बीड जिल्ह्यातील नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतील उदंड वडगाव येथे इंजिन आणि रसवंती घेऊन जात असताना गावकऱ्यांनी एका चोरट्याला रंगेहाथ पकडल्याची घटना घडली आहे. या परिसरात यापूर्वीही रसवंतीची इंजिने अनेक वेळा चोरीला गेल्याच्या घटना घडल्या असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. घटनेनंतर गावकऱ्यांनी पोलिसांना बोलावले. मात्र पोलिस चोरट्याच्या बाजूने बोलत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला असून यामुळे पोलिस आणि गावकऱ्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाल्याचे व्हिडिओमध्ये दिसून येत आहे.दरम्यान, या प्रकरणात संबंधित चोरट्याविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## वनविभागाने ३ महिन्यांपासून कोंडलेल्या २१ बिबट्यांचे पुनर्वसन
### बीड–कडा येथील जीवदया फाऊंडेशनच्या पाठपुराव्याला यश



कडा (बा. म.पवार याजकडून)::: महाराष्ट्रात मानव बिबट संघर्षात सुरक्षिततेचा उपाय म्हणून वनविभागामार्फत जागोजागी पिंजऱ्यात सरसकट बिबटे पकडण्याची मोहीम राबविण्यात गेले पुनर्वसन न झाल्याने त्यांचा जीव टांगणीला लागला होता बीड जिल्ह्यातील कडा जीवदया फाऊंडेशनच्या पाठपुराव्यामुळे वनविभागाने कोंडलेल्या ३ महिन्यांपासून २१ बिबट्यांचे तात्काळ पुनर्वसन केल्याची घटना घडली. अहिल्यानगर येथील सावताळ वडगाव येथे वन विभागाच्या नर्सरीमध्ये ३ महिन्यापासून २१ बिबटे

पान २ वर

## पाटोदा येथे लोकअदालतीत ९७ प्रकरणे निकाली; २२ लाख ६५ हजार ४९५ रुपयांची वसुली
### मुख्य दिवाणी न्यायाधीश एम.ए.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन; पक्षकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



पाटोदा प्रतिनिधी :- पाटोदा येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने शनिवार (दि. १४ मार्च) रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. पाटोदा न्यायालयाचे मुख्य दिवाणी न्यायाधीश एम. ए. शिंदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या लोकअदालतीत एकूण ९७ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून २२ लाख ६५ हजार ४९५ रुपयांची वसुली करण्यात आली.
या लोकअदालतीसाठी दोन पॅनेलची स्थापना करण्यात आली होती. पॅनल क्रमांक १ वर पॅनल प्रमुख म्हणून दिवाणी न्यायाधीश क.स्तर एम. ए. शिंदे यांनी काम पाहिले, तर पॅनल सदस्य म्हणून आर. एस. घुले (विधीज्ञ, वकील संघ पाटोदा) यांनी सहकार्य केले. पॅनल क्रमांक २ वर दिवाणी न्यायाधीश गीरे यांनी कामकाज पाहिले, तर पॅनल सदस्य म्हणून एस. एन. घुमरे (वकील संघ पाटोदा) यांनी सहभाग नोंदविला.लोकअदालतीत दाखल असलेल्या ९८८ प्रकरणांपैकी २४ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यामध्ये ४ लाख ५२ हजार ११३ रुपये वसूल करण्यात आले. तसेच दाखलपूर्व ३८५ प्रकरणांपैकी ७३ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून १८ लाख १३ हजार ३८२ रुपये वसूल करण्यात आले. अशा प्रकारे एकूण ९७ प्रकरणे निकाली निघून २२ लाख ६५ हजार ४९५ रुपयांची वसुली झाली.या लोकअदालतीच्या यशस्वी

पान २ वर



मराठा भूषण, महाराष्ट्राचे तत्कालीन आरोग्य मंत्री तथा भूम–परंडा–वाशीचे आमदार तानाजीराव सावंत यांचा वाढदिवस बीडमध्ये अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्यांना दीर्घायुष्य मिळण्याबरोबरच त्यांच्या मंत्रीपदासाठी पेंडगाव येथील मारुती मंदिरात महा अभिषेक करून महाप्रसाद वाटप करण्यात आला. तसेच यावेळी दिव्यांग व्यक्तींना तीन चाकी सायकलिंगचेही वाटप करण्यात आले, यावेळी छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोकअण्णा रोमन यांच्यासह सर्व छावा मित्र परिवार उपस्थित होता.

## विवाहीतेचा छळ
### दिर, सासु, सासऱ्याविरूध्द ग्रामीण पोलिसात तक्रार

माजलगांव दि.१४(प्रतिनिधी):-ालुक्यातील मंजरथ येथे विवाहीता महिलेस बांधकामासाठी दोन लाख रूपये दे अन्यथा येथे राहु नको असे म्हणत तिचा छळ केला व तिला दिर, सासु व सास-याने मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरूध्द ग्रामीण पोलिसात विवाहीतेने तक्रार दिली आहे.
दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, तालुक्यातील मंजरथ येथील दुर्गा किशोर वाघमारे यांना त्यांचे दिर गणेश बबन वाघमारे, सासु मिरा बबन वाघमारे, सासरे बबन किसन वाघमारे यांनी दि. ११ मार्च रोजी रात्री दुर्गा यांचे पती किशोर हे घरी नसतांना वरील तिघांनी शिवीगाळ करत तु व तुझ्या नव-याने येथे रहायचे नाही व बांधकामासाठी दोन लाख रूपये आणुन द्या असे म्हणत दिर, सासु, सास-याने लाथा, बुक्या व चापटाने मारहाण करत तुला व तुझ्या नव-याला व दोन्ही मुलांना खल्लास करून टाकील अशी धमकी दिली. यावेळी दुर्गा वाघमारे यांनी त्यांचे भाउ शंकर शेषेराव धारक यास बोलावुन घेतले पण त्यांनाही मारहाण केली. याप्रकरणी वरील तिघांविरूध्द ग्रामीण पोलिसात तक्रार देण्यात आली आहे.

## विनयभंगाचा गुन्हा मागे घेण्यासाठी पीडितेच्या घरावर दगडफेक
### पोलीस अधीक्षकांकडे धाव: वाळू माफियांच्या दबावापोटी पेठ बीड पोलिसांनी पीडितेची तक्रार बदलल्याचा आरोप

बीड (प्रतिनिधी):बीड शहरात गुन्हेगारांचे मनोबल इतके वाढले आहे की, एका १४ वर्षीय मुलीच्या विनयभंगाचा गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपींनी भरदिवसा पीडितेच्या घरात घुसून दगडफेक केली. या हल्ल्यात पीडितेची सासू आणि वहिनी जखमी झाल्या असून घराचे मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे, या गंभीर घटनेची तक्रार देण्यास गेल्यावर पेठ बीड पोलिसांनी 'वाळू माफियांच्या' दबावाखाली केवळ एनसी दाखल करून आरोपींना पाठीशी घातल्याचा धक्कादायक आरोप पीडित महिलेने केला आहे.
पीडितेच्या आईने पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पेठ बीड भागातील रहिवासी महिलेच्या १४ वर्षीय मुलीची आरोपी इरफान उस्मान शेख याने १० ऑक्टोबर २०२५ रोजी छेड काढली होती. याप्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल आहे. इरफानचा अटकपूर्व जामीन जिल्हा न्यायालयाने फेटाळला होता, मात्र सध्या तो उच्च न्यायालयाच्या अंतरिम जामिनावर बाहेर आहे. हाच गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपी सातत्याने पीडित कुटुंबाला धमकावत होते. दि.१३ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वा. सुमारास एका महिलेसह हुसेन शेख, इरफान शेख आणि इमरान शेख या चौघांनी मिळून पीडितेच्या घरात प्रवेश केला. केस मागे घे, नाहीतर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत त्यांनी घराच्या

पान २ वर

## सराफांची जिल्हास्तरीय कमिटी स्थापन करणार– पोलिस अधीक्षक नवनीत काँवत
### पोलीस अधीक्षक काँवत, एलसीबीचे पीआय बंटेवाड सत्कारीत

माजलगाव, (प्रतिनिधी) : शासनाच्या परिपात्रानुसार सराफांची जिल्हास्तरीय कमिटी स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक तालुक्यातून सराफा व्यापाऱ्यांचे दोन - दोन प्रतिनिधीची निवड करत ती नावे शासनाकडे पाठवले जाणार असल्याचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सांगितले.
माजलगाव येथील सराफ सुवर्णकार असोसिएशनच्या वतीने (आयपीसी ४११ /बीएनएस ३१७) संदर्भात सुवर्णकार व्यापाऱ्यांना कायदेशीर मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने आयोजित मार्गदर्शक मेळावा व कर्तव्यदक्षता व जनसेवा गौरव मेळावा कार्यक्रमात बोलत होते. पुढे बोलतांना पोलिस अधीक्षक नवनीत काँवत म्हणाले की, सराफ व्यापाऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा प्रत्येक दुकानदारांनी आपल्या दुकानासमोर सीसीटीव्ही लावावेत आणि सोने विकायला आलेला खरेदीसाठी आलेला या माणसांची पारख करावी. अनोळखी माणसाकडून सोने खरेदी करू नये तसेच सराफी व्यापाऱ्यांचे एखाद्या गुन्हेगाराने नाव घेतले तर त्या व्यापाऱ्यास पोलीस लगेच अटक करणार नाहीत तर सदर प्रकरणात सखोल माहिती घेऊन त्यांच्यावर कारवाई केली जाईल. पोलिस आणि जनता हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत जनतेने पोलिसांना मदत करावी पोलीस ही त्यांना मदत करण्यास तत्पर आहेत असे आवाहन त्यांनी केले. तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी देखील उपस्थित सुवर्णकार बांधवांना मार्गदर्शन करताना कायद्याचे पालन केल्यास व्यापाऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, असे सांगितले. सुवर्णकारांनी सीसीटीव्ही कॅमेरे, व्यवहारांची नोंदवही व ग्राहकांच्या ओळखपत्राची तपासणी यांसारख्या सुरक्षा उपाययोजना वाढवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

## ऊसाच्या फडात वयोवृद्ध वारकऱ्याचा जळालेला मृतदेह आढळल्याने हळहळ



अंबाजोगाई दि १४(प्रतिनिधी)- तालुक्यातील ममदापूर शिवारात शनिवारी पहाटे एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शेतातील ऊसाला लागलेल्या आगीत एका ६० वर्षीय वृद्धाचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. विश्वनाथ पांचाळ (वय ६०) असे मृत व्यक्तीचे नाव असून, त्यांनी आजाराला कंटाळून स्वतःला जाळून घेत आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.
ऊसाच्या सरीत सापडला मृतदेह ममदापूर येथील शेतकरी दिलीप मोतीराम देशमुख यांच्या गावालगत असलेल्या दोन एकर ऊसाला अचानक आग लागली. आज पहाटे साडेपाचच्या सुमारास त्यांच्या सालगड्याने ही माहिती दिली. जेव्हा आग विझवण्याचे प्रयत्न सुरू झाले, तेव्हा ऊसाच्या सरीमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह पूर्णतः जळालेल्या अवस्थेत दिसून आला. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी अंबा जोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला.मृत विश्वनाथ पांचाळ हे उच्चशिक्षित ( एमए) होते आणि वारकरी संप्रदायाशी जोडलेले होते. मात्र, गेल्या काही काळापासून ते टीबी (क्षयरोग) या आजाराने ग्रस्त होते.

पान २ वर

## चोरलेल्या तीन लाखांच्या तीन मोटार सायकली जालना जिल्ह्यातून जप्त
### माजलगाव शहर पोलिसांची चमकदार कामगिरी



माजलगाव दि.१४(प्रतिनिधी)- माजलगाव शहर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने चोरलेल्या तीन मोटारसायकली ज्याची किंमत ३लाख रुपये आहे. त्या गाड्या जालना जिल्ह्यातून जप्त करून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या कारवाईमुळे नागरिकांमधून पोलिसांविषयी समाधान व्यक्त करण्यात येत आहे. सध्या माजलगाव तालुक्यासह राज्यभरात मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून अशा वाहनांचा शोध घेणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. मात्र माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने तत्परता दाखवत ही कारवाई यशस्वी केली.गुप्त माहितीच्या आधारे

पान २ वर

## तुळजाभवानी अर्बनची संवेदनशील भूमिका
### मृत खातेदाराच्या कुटुंबाला दिलासा
#### अपघाती मृत्यू झालेल्या खातेदाराच्या गोल्ड लोनची २.१५ लाखांची विमा भरपाई; दागिने वारसदारांकडे सुपूर्त



माजलगाव : (प्रतिनिधी) येथील तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या तीर्थपुरी शाखेच्या एका खातेदाराचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर संस्थेच्या वतीने त्यांच्या गोल्ड लोन कर्जावर विमा मंजूर करून कुटुंबाला मोठा दिलासा देण्यात आला. तीर्थपुरी शाखेचे सोनेतारण कर्ज खातेदार नरवडे गणेश सूर्यभान यांचे अपघाती अकाली निधन झाले होते. त्यांच्या नावावर असलेल्या सोनेतारण कर्ज खात्यावरील २ लाख १५ हजार रुपयांचा विमा मंजूर करण्यात आला. संबंधित विमा रक्कम त्यांच्या कर्ज खात्यात जमा करून ते खाते पूर्णपणे बंद करण्यात आले.

पान २ वर

## कर्णकर्कश सायलेन्सरमुळे पिंपळनेरकर त्रस्त; दुचाकी स्वारांवर कारवाईची मागणी

पिंपळनेर दि.१४ (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात रात्री-अपरात्री कर्णकर्कश आवाज करणाऱ्या सायलेन्सर लावलेल्या दुचाकींमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. फटाक्यांसारखे आवाज करीत बेलगामपणे फिरणाऱ्या दुचाकीस्वारांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी पिंपळनेर पोलिसांकडे केली आहे.
पिंपळनेर शहरातील मेन रोड, घाटूळगल्ली, नाथापूर रोड, बीड रोड, बाजार परिसरासह अनेक भागांत रात्री उशिरापर्यंत बुलेटसह इतर दुचाकींचे सायलेन्सर बदलून मोठ्या आवाजात वाहन चालवले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला. या कर्णकर्कश आवाजामुळे आजारी रुग्ण, हृदयविकार व रक्तदाबाचे रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला, लहान मुले, तसेच दहावी-बारावी व स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्रस्त होत असल्याचे ही नागरिकांनी सांगितले. कर्कश सायलेन्सर असलेल्या दुचाकींवर कठोर कारवाई करून अशा वाहनांना जप्त करावे. सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत. तसेच, अशा सायलेन्सरची विक्री व बसविणाऱ्या गॅरेज धारकांवरही कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे. पोलिसांकडे मनुष्यबळ कमी असल्यास ग्राम सुरक्षा दलाची स्थापना करून त्यांना तात्पुरते अधिकार द्यावेत, असेही सुचविण्यात आले आहे.

CMYK